# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

April 2023 - May 2023 / Issue No. 9 | Price : Rs. 30/-










**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांच्या स्मृती व्याख्यानमालेचे ५० वे सुवर्ण महोत्सवी पुष्प...**

**'आत्मनिर्भर भारत'**

**१५ जून, दरबार हॉल, राजभवन मुंबई**

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ॥धृ॥

भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाव देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ॥१॥

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीव घेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ॥२॥

गीतकार : कविवर्य श्री. राजा नीळकंठ बढे

MACCIA 100
Apex Chamber of the State 1927-2027
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

April 2023 - May 2023/ Issue No. 9

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अॅग्रिकल्चर**

ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई- ४००००१
फोन : (०२२) २२८५५८५९/६०
ई-मेलः maccia@maccia.org.in
वेबसाईट : www.maccia.org.in

**संपादकीय समिती**

- अध्यक्ष
  **ललित गांधी**
- उपाध्यक्ष
  **करुणाकर शेट्टी**
  **शुभांगी तिरोडकर**
  **रविंद्र माणगावे**
  **सुधाकर देशमुख**
  **चंद्रशेखर पुनाळेकर**
  **तनसुख झांबड**
- प्रभारी सरकार्यवाह
  **सागर नागरे**
- संपादक
  **विनी दत्ता**
- सहसंपादक
  **अविनाश पाठक, सचिन यादव**
- **उत्तर महाराष्ट्र शाखा कार्यालय**
  २०१, सारडा संकुल, वकीलवाडी, नाशिक - १.
  फोनः (०२५३)२५७७७०४ । ई-मेलः nsk@maccia.org.in
- **रत्नागिरी जिल्हा कार्यालय**
  जावकर प्लाझा, जयस्तंभ, रत्नागिरी.
- **जळगाव जिल्हा कार्यालय**
  २१-ए, श्रीराम स्टेट बँक कॉलनी, रिंगरोड, जळगाव - ४२५००१.

## अंतरंग

१. मनोगत

२. महाराष्ट्र चेंबरचे कार्य कौतुकास्पद : राज्यपाल रमेश बैस

३. महाराष्ट्राच्या औद्योगिक व्यापार, विकासात चेंबरचे योगदान : उपराष्ट्रपती जगदीश धनकड

४. शेठ वालचंद हिराचंद स्मृती व्याख्यानाचे आमंत्रण लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी स्विकारले.

५. नव्या उद्योगांमधून मिळणार सव्वा लाख तरूणाना रोजगार

६. परराष्ट्र व्यापार धोरण २०२३ : पीयुष गोयल

७. जागतिक अर्थकारणाला भारत गती देणार

८. महाराष्ट्राची उद्योग भरारी : ललित गांधी

९. आष्ट्रा एमआयडीसी होणार सुपरफास्ट

१०. शाहूवाडीत एमआयडीसी : मजलेत होणार ड्रायपोर्ट

११. करिअरविषयक मार्गदर्शनासाठी राज्यात लवकरच हेल्पलाइन : मंत्री मंगलप्रभात लोढा

११. अमरावतीत होणार मेगा टेक्सटाइल पार्क

१२. मालेगावच्या मॅनिटॅब फार्मामध्ये अमेरिकन कंपनीची अब्जावधींची गुंतवणूक

**Note :** Articles published in this bulletin do not necessarily reflect the views of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture.



संपादकीय..

ललित गांधी

अध्यक्ष

# गौरवशाली महाराष्ट्राच्या स्थापना दिनाच्या आपणा सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा !

भारताच्या अर्थव्यवस्थेत व औद्योगिक उत्पादनात अग्रेसर असणाऱ्या आणि महत्वपूर्ण राज्य म्हणून लौकीक मिळवलेल्या 'महाराष्ट्राच्या' विकासात 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' चे महत्वपूर्ण यो-गदान आहे, ही आपणा सर्वांसाठीच अभिमानाची गोष्ट आहे.

चेंबरचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांची दूरदृष्टी, दुर्दम्य साहस, चिकाटी यामुळेच महाराष्ट्र आज हे वैभव पाहतो आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या औद्योगिकरणात शेठ वालचंद हिराचंद यांचे अतुलनीय योगदान आहे.

त्यांच्या स्मृती व्याख्यानमालेचे सुवर्णमहोत्सवी ५० वे पुष्प त्यांच्या या अतुलनीय योगदानाला साजेसे असे होणार आहे. या वर्षाचे ५० वे पुष्प राजभवनाच्या 'दरबार हॉल' या अतिविशिष्ट सभागृहात संपन्न होणे, हा त्यांच्या कार्याप्रती आदर व्यक्त करण्याचा गौरवपूर्ण दिवस असेल.

महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने या राज्याच्या स्थापनेचा इतिहास डोळ्यासमोर येणे साहजिक आहे. भाषावर प्रांतरचना करण्याचा संकल्पनेतून राज्य रचना सुरू असताना 'संयुक्त महाराष्ट्र'चे जे आंदोलन झाले. त्याचे मुख्य केंद्र कालाघोडा परिसरातील महाराष्ट्र चेंबरचे मुख्यालय होते. यानिमित्ताने सातत्याने चेंबरमध्ये येणारे दिवंगत यशवंतरावजी चव्हाण या राज्याचे पहिले मुख्यमंत्री बनले, त्यांचे चेंबरवर विशेष प्रेम होते व त्यामुळेच राज्य प्रशासनामध्ये नेहमीच महाराष्ट्र चेंबरला निर्णय प्रक्रियेत महत्वाचे स्थान मिळाले. एवढेच नाही तर या राज्याचे नाव 'महाराष्ट्र' हे चेंबरच्या नावावरून घेतले गेले यापेक्षा मोठा गौरव काय असू शकतो. ०१ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती होण्यापूर्वीचे शेवटचे मुख्यमंत्री बी.जी.खेर हे सुध्दा महाराष्ट्र चेंबरचे पदाधिकारी होते, हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून राज्याच्या औद्योगिकरणाचा पाया रचून सातत्याने उद्योग-व्यापार विकासाची कार्य करणारी राज्यातील शिखर संस्था म्हणून 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' नेहमीच महत्वाची भूमिका बजावली आहे. विकासासाठी सतत प्रयत्नशील राहण्याची महाराष्ट्र चेंबरची परंपरा आजही आपण तितक्याच सक्षपणे पार पाडत आहोत. इतकेच नव्हे तर यावर्षी महाराष्ट्र चेंबरच्या ९६ वर्षाच्या इतिहासातील सर्वाधिक म्हणजेच १ कोटी, ३२ लाख इतके निव्वळ उत्पन्न मिळवून, संस्थेला आर्थिक दृष्टया भक्कम करण्याचेही यशस्वी प्रयत्न सुरू आहेत.

बदलत्या काळानुसार प्राधान्यक्रम बदलतील, नवतंत्रज्ञानाचा वापर अपरिहार्य बनला आहे, अशा काळात नवतरूणांपासून महिलांपर्यंत सर्वांना व्यापार-उद्योगासाठी प्रोत्साहीत करण्याचे कार्य अविरतपणे सुरू आहे. आपण सर्वांनी एकत्रितपणे आपापसातील व्यापार वाढविण्याबरोबरच राज्याच्या व देशाच्या विकासात सहभागी होण्याचा संकल्प करावा, याच महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने शुभेच्छा.

# महाराष्ट्र चेंबरचे कार्य कौतुकास्पद : राज्यपाल रमेश बैस

## शेठ वालचंद हिराचंद स्मृती व्याख्यानाचे ५० वे सत्राचे आमंत्रण स्वीकारले

## १५ जून रोजी राजभवनातील दरबार हॉलमध्ये होणार दिमाखदार सोहळा



**राज्यपाल रमेश बैस यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी सोबत महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, गव्हर्निंग काऊन्सिल सदस्य उत्तम शहा, नीरव देडीया, चेंबरचे सहकार्यवाह सागर नागरे.**

**मुंबई :** महाराष्ट्र चेंबरचे कार्य कौतुकास्पद असून राज्याच्या अर्थव्यवस्थेत महत्वाची भूमिका बजावित असल्याचे गौरवोद्गार राज्यपाल रमेश बैस यांनी काढले. त्यासह महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांच्या स्मृती व्याख्यानाच्या ५० वे सत्राचे निमंत्रण त्यांनी स्विकारले. १५ जून २०२३ रोजी सायंकाळी ०४:०० वाजता राजभवनातील दरबार हॉल मध्ये हा सोहळा संपन्न होणार आहे.



महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी त्यांची मुंबईत भेट घेतली यावेळी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी राज्यपाल रमेश बैस यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सन्मनापूर्वक सत्कार केला.

पुढे ते म्हणाले चेंबर राज्याच्या व्यापार, उद्योगात मोठी महत्वाची भूमिका बजावित आहे. अर्थव्यवस्थेत महाराष्ट्र चेंबरचे महत्वाचे स्थान असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. भेटीप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, गव्हर्निंग काऊन्सिल सदस्य उत्तम शहा, नीरव देडीया, चेंबरचे सहकार्यवाह सागर नागरे उपस्थित होते.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी स्मृती व्याख्यानाची माहिती त्यांना दिली. ते म्हणाले, महाराष्ट्र चेंबरचे संस्थापक, भारताच्या उद्योग जगतातील महनीय व्यक्तिमत्व 'शेठ वालचंद हिराचंद' यांच्या स्मरणार्थ दरवर्षी व्याख्यान संपन्न होते. जून महिन्यात ५० वे स्मृति व्याख्यानचा 'आत्मनिर्भर भारत' असा व्याख्यानाचा विषय आहे. यापूर्वी झालेल्या व्याख्यानात सरसंघचालक मोहनजी भागवत, तत्कालीन प्रधानमंत्री मोरारजी देसाई, चिफ जस्टीस वाय. व्ही. चंद्रचूड, जस्टीस चंद्रशेखर धर्माधिकारी, तत्कालीन वित्तमंत्री मधु दंडवते, अरुण जेटली, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अरुण गोवारीकर, डॉ. अनिल काकोडकर, डॉ. रघुनाथ माशेलकर या ज्येष्ठ मान्यवरांचे अभिभाषण झाले आहे.

अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, राज्याच्या व्यापार आणि उद्योग वाढीसाठी ९५ वर्षापासून महाराष्ट्र चेंबर कार्यरत आहे. महाराष्ट्रातील विविध व्यापार आणि उद्योगांतील ८५० संस्थातील आणि ७ लाख उद्योग आणि ३० लाखांहून अधिक व्यापार संघटनेच्या शिखर संस्थेचे प्रतिनिधीत्व करत आहे.

# महाराष्ट्राच्या औद्योगिक - व्यापार विकासातील महाराष्ट्र चेंबरचे योगदान गौरवास्पद : उपराष्ट्रपती जगदीश धनकड

## महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिल्ली येथे घेतली उपराष्ट्रपतींची भेट





**उपराष्ट्रपती महामहीम जगदीश धनकड यांची चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी नवी दिल्ली येथे भेट घेतली. यावेळी उपस्थितात खासदार धैर्यशील माने, संदीप भंडारी.**

**नवी दिल्ली :** उपराष्ट्रपती महामहीम जगदीशजी धनकड यांची महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अँण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी नवी दिल्ली येथे संसदेतील त्यांच्या कार्यालयात भेट घेतली.

महाराष्ट्राच्या औद्योगिक व्यापार विकासातील महाराष्ट्र चेंबरचे योगदान गौरवास्पद असल्याचे गौरवोद्गार उपराष्ट्रपदी जगदीश धनकड यांनी काढले. त्यासह महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र विभागीय कार्यालय- नाशिकच्या सुवर्णमहोत्सव सांगता समारंभासाठी त्यांना दिलेले आमंत्रण त्यांनी स्वीकारले. या वेळी हातकणंगले मतदारसंघाचे खासदार धैर्यशील माने, महाराष्ट्र चेंबरचे युवा उद्योजक समितीचे चेअरमन संदीप भंडारी उपस्थित होते.

चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी महाराष्ट्र चेंबरतर्फे राबविल्या जात असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, चेंबरचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांचे भारतीय उद्योग जगतातील अफाट योगदान आहे. देशाच्या जडणघडणीत उद्योजकांचा मोठा वाटा आहे. उद्योजक, व्यापारी आणि सरकारमधील महत्वाचा दुवा म्हणून महाराष्ट्र चेंबर कार्यरत आहे. महाराष्ट्राच्या उद्योग, व्यापाराच्या जडणघडणीत चेंबरचा मोठा वाटा आहे. उद्योजक, व्यापारी यांचे हक्कांचे व्यासपीठ चेंबर असून त्या माध्यमातून राज्यातील अनेक प्रश्न मार्गी लागले आहेत.

अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, महाराष्ट्र चेंबरच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात उत्तर महाराष्ट्र शाखेच्या नवीन कार्यालयाची उभारणी केली जाणार आहे. उत्तर महाराष्ट्र शाखा माइलस्टोन आहे. उत्तर महाराष्ट्रातील व्यापार उद्योगाच्या विकासासाठी उत्तर महाराष्ट्र शाखेने महत्त्वाचे कार्य केलेले असून व्यापार उद्योगाच्या विकासासाठी व्यापारी उद्योजकांच्या विविध संघटना स्थापन केल्या आहेत. दरम्यान अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र विभागाच्या सुवर्ण महोत्सव सांगता समारंभास उपस्थित राहण्यासाठी आमंत्रण दिले. त्यांनी महाराष्ट्र चेंबरचे आमंत्रण स्विकारुन उपस्थित राहण्याची ग्वाही अध्यक्ष ललित गांधी यांना दिली.

# शेठ वालचंद हिराचंद स्मृती व्याख्यानाचे ५० वे सत्राचे आमंत्रण लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी स्वीकारले

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांना आश्वासन



**लोकसभा सभापती ओमजी बिर्ला व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिल्ली ते कोटा या मार्गावर रेल्वे प्रवास एकत्रित केला व यावेळी विविध विषयांवर चर्चा केली. सोबत संदीप भंडारी.**

**दिल्ली :** जून महिन्यात होत असलेल्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांच्या स्मरणार्थ होत असलेल्या स्मृती व्याख्यानाचे ५० वे सत्राचे निमंत्रण लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी स्वीकारले आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी त्यांची दिल्ली ते कोटा या मार्गावर रेल्वे प्रवास भेट घेऊन कार्यक्रमासाठी येण्याची विनंती केली. त्यांनी ही विनंती तत्काळ मान्य करुन आमंत्रण स्विकाले.

लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲग्रीकल्चरतर्फे सुरु असलेल्या विविध उपक्रमांची माहिती अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी महाराष्ट्र चेंबरचे काम कौतुकास्पद असून अर्थव्यवस्थेच्या जडणघडणीत मोठा कणा असल्याचे गौरवोद्वार काढले. चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी अधिक माहिती देताना म्हणाले, महाराष्ट्राच्या व्यापार आणि उद्योग वृद्धीसाठी गेल्या ९५ वर्षापासून महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ग्रीकल्चर सातत्याने कार्यरत आहे. राज्यातील सर्वात मोठी असलेली ही शिखर संस्था विविध क्षेत्रात आपल्या कार्याचे योगदान देत आहे. महाराष्ट्रातील विविध व्यापार आणि उद्योगांतील ८५० संस्थातील आणि ७ लाख उद्योग आणि ३० लाखांहून अधिक व्यापार संघटनेची शिखर संस्थेचे प्रतिनिधीत्व करण्याची धुरा महाराष्ट्र चेंबर सांभाळत आहे.

महाराष्ट्र चेंबरचे संस्थापक, फिक्की संस्थेचे संस्थापक सदस्य आणि भारताच्या उद्योग जगतातील महनीय व्यक्तिमत्व 'शेठ वालचंद हिराचंद' यांच्या स्मरणार्थ दरवर्षी व्याख्यान आयोजित केले जाते. या वर्षी जून महिन्यात ५० वे स्मृति व्याख्यान आयोजित केले आहे. या वर्षी 'आत्मनिर्भर भारत' असा व्याख्यानाचा विषय आहे. या स्मृती व्याख्यानात विचारपुष्प गुंफावेत, असे आवाहन चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.

दरम्यान यापूर्वी झालेल्या व्याख्यानात सरसंघचालक मोहनजी भागवत, तत्कालीन प्रधानमंत्री मोरारजी देसाई, चिफ जस्टीस वाय. व्ही. चंद्रचूड, जस्टीस चंद्रशेखर धर्माधिकारी, तत्कालीन वित्तमंत्री मधु दंडवते, अरुण जेटली, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अरुण गोवारीकर, डॉ. अनिल काकोडकर, डॉ. रघुनाथ माशेलकर या ज्येष्ठ मान्यवरांनी विचार गुंफले असल्याचेही अध्यक्ष गांधी यांनी स्पष्ट केले.



# नव्या उद्योगांमधून मिळणार सव्वालाख तरूणांना रोजगार

## ‘दावोस’ मधील १३ उद्योजकांना मिळाली जागा, ७८ हजार कोटींची गुंतवणूक ; सोलापूर, पुणे, औरंगाबाद, कोकणात जागा

**सोलापूर** : दावोस दौऱ्यावर गेल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १ लाख ३७ हजार कोटींची गुंतवणूक येणार असल्याचे स्पष्ट केले होते. आता त्यातील १३ उद्योजकांची ७८ हजार ६६ कोटींची गुंतवणूक निश्चित झाली आहे. त्या उद्योजकांना जागा निश्चित झाली असून त्यातून ५९ हजार ८९५ जणांना रोजगार मिळणार आहे.

राज्यातील काही उद्योग परराज्यात गेल्यानंतर बेरोजगारांच्या रोजगाराची चिंता व्यक्त करण्यात आली. पण, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दावोस दौऱ्यावर गेल्यानंतर महाराष्ट्रात उद्योग यावेत, म्हणून जवळपास १९ उद्योजकांशी

### राज्यात येणार नवे १९ उद्योग

महाराष्ट्रातील जवळपास दोन लाख कोटींची गुंतवणूक असलेले उद्योग गुजरातला गेले. या पार्श्वभूमीवर कोंडीत सापडलेल्या राज्य सरकारसाठी नवे उद्योग राज्यात आणणे आव्हानात्मक होते. मुख्यमंत्र्यांनी जाहीर केल्याप्रमाणे आता राज्याता एक लाख ३७ लाख कोटींची गुंतवणूक करणारे १९ उद्योग उभारले जाणार आहेत. त्यातून आगामी वर्षभरात राज्यातील एक लाख सहा हजार ५४५ तरूण-तरूणींना रोजगार मिळेल, असा विश्वास एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी ‘सकाळ’शी बोलताना व्यक्त केला आहे.

### गुंतवणूक आणि कार्यवाही

उद्योगांसाठी जागा फायनल
**७**

एकूण गुंतवणूक
**५४,७३० कोटी**

रोजगार निर्मिती
**५४,७३०**

### प्रस्तावित गुंतवणूक

जागा निश्चित, पण वाटप नाही
**६**

एकूण गुंतवणूक
**२३,३३६ कोटी**

रोजगार निर्मिती
**२३,३३६**

जागा पाहणारे उद्योजक
**६**

एकूण गुंतवणूक
**५९,००० कोटी**

रोजगार निर्मिती
**४५,६५०**



(संग्रहीत)




(संग्रहीत)

करार केले होते.

आता त्यापैकी १३ उद्योजकांना सोलापूर, पुणे, औरंगाबाद, कोकण अशा ठिकाणी जागा दिल्या आहेत. सद्य:स्थितीत सात उद्योजकांना जागा वाटप करण्यात आले आहे. त्यांच्याकडून ५४ हजार ७३० कोटींची गुंतवणूक केली जाणार असून त्यांचे काम काही दिवसांत सुरु होणार आहे. तसेच सहा उद्योजकांची जागा निश्चित झाली असून 'एमआयडीसी'कडून त्यांना जागा देण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे.

त्या उद्योगांमधून साडेपाच हजार तरूणांना रोजगार मिळणार आहे. त्यानंतर पुढील दोन महिन्यांत आणखी सहा उद्योजकांना जागा दिली जाणार असून त्यांनी काही ठिकाणची जागा पाहणी केली आहे. त्यांच्याकडून अंदाजे ६० हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे. त्या उद्योगांमधून राज्यातील ४५ हजार ६५० तरूण-तरूणींना रोजगार मिळेल, असा विश्वास 'एमआयडीसी'ने व्यक्त केला आहे.

## महाराष्ट्र चेंबरने भरविलेल्या 'मायटेक्स' एक्स्पोत मुख्यमंत्र्यांची घोषणा

राज्यातील व्यापाराला चालना देण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँण्ड ॲग्रीकल्चर, महाराष्ट्र सरकारचा उद्योग विभाग आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने १७ ते २६ फेब्रुवारी २०२३ मध्ये ब्रांदा कुर्ला कॉम्प्लेक्स मुंबई येथे महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्स्पो (मायटेक्स) भरविण्यात आले. महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्स्पोचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते भव्य उद्घाटन संपन्न झाले होते. त्या वेळी महाराष्ट्र राज्य गुंतवणूकीसाठी 'फेव्हरेट डेस्टिनेशन', असून उद्योजक, व्यापाऱ्यांना सर्वोतोपरी सहकार्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली होती. महाराष्ट्र चेंबरचे सातत्याने सहकार्य लाभत आहे. राज्याच्या विकासात महाराष्ट्र चेंबरचे मोठे योगदान आहे. भविष्यातही महाराष्ट्र चेंबरची गरज असल्याचे प्रतिपादनही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाषणात केले होते.

### महाराष्ट्र चेंबरचे सातत्याने प्रयत्न: चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी चेंबरतर्फे राज्यातील व्यापार आणि उद्योगाला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले जात आहे. तसेच राज्यातील उद्योग, व्यापाराची सदयस्थिती सांगून अनेक मागण्या त्यांच्यासमोर मांडल्या होत्या. या मागण्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्य करुन पूर्ण करण्याचे ठोस आश्वासन दिले होते. उद्योग, व्यापाराला चालना देण्यासाठी महाराष्ट्र चेंबर महत्वाची भूमिका बजावित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते.

# स्क्रॅपसाठी योजना तयार, पाच मिनिटांत होणार सर्व वाहनांचे पार्ट सुटे

# 'व्हेईकल रिसायकलिंग अँण्ड मेटल रिसायकलिंग' प्रकल्प



## फाउंड्रीसह राज्यातील उद्योग क्षेत्राला मिळणार बळ, प्रकल्पासाठी पुढाकाराची गरज

**कोल्हापूर :** केंद्र आणि राज्य सरकारने स्क्रॅप पॉलिसीअंतर्गत १५ ते २० वर्षे पूर्ण झालेली वाहने भंगारात काढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार देशातील सुमारे १ कोटी २ लाख जुनी वाहने भंगारात जातील. त्यामुळे राज्यातील ऑटोमोबाईल इंडस्ट्रीजला बूस्ट मिळणार आहे. या इंडस्ट्रीजला विविध स्वरूपातील वाहनांच्या सुट्या भागाच्या स्वरूपात कास्टिंग पुरविणाऱ्या राज्यातील फाउंड्री उद्योगाला अधिक बळ मिळणार आहे. आयात केले जाणारे स्क्रॅप कास्टींग सहजपणे उपलब्ध होणार आहे. कोल्हापुरात 'व्हेईकल रिसायकलिंग अँण्ड मेटल रिसायकलिंग' या प्रकल्पाची योजना तयार आहे. त्यासाठी सुमारे १०० कोटी रुपये आणि १० एकर जागेची गरज आहे. (३००० टन /महिना) हा प्रकल्प सुरु झाल्यास महिन्याला सुमारे ३ हजार टन स्क्रॅप मिळू शकेल. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अॅग्रीकल्चरचे कोल्हापूरचे गव्हर्निंग काऊन्सिल मेंबर आणि CII संस्थेचे आंतरराष्ट्रीय मटेरियल रिसायकलिंग एक्स्पर्ट प्रकाश मालाडकर आणि युरोपमधील झेक प्रजासत्ताक Stinchcombe S.R.O. यांनी मिळून ही योजना तयार केली आहे. सर्व प्रकारच्या स्क्रॅप मटेरियलचा (Recycle+Reuse+Reclamation) रिसायकल, पुनर्वापर आणि पुर्नप्राप्ती अशी या प्रकल्पाची त्रिसूत्री आहे.

देशात सुझकी, महिंद्रा आणि टाटा कंपनीचा रिसायकलिंगचा प्रकल्प आहे. कोल्हापुरात प्रकल्प झाल्यास देशातील चौथा प्रकल्प म्हणून नावारुपास येणार आहे. १५ वर्षे जुन्या वाहनांच्या वापराने प्रदूषण वाढते. इंधन अधिक खर्च होते. ते टाळण्यासाठी केंद्र, राज्य सरकारने अशा जुन्या वाहनांसाठी स्क्रॅप पॉलिसी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. १५ वर्षे पूर्ण झालेली सरकारी वाहने भंगारामध्ये काढण्यासाठी राज्य सरकारने 'महाराष्ट्र स्क्रॅप ट्रेड कॉर्पोरेशन पोर्टल' सुरू केले आहे. १ एप्रिल, २०२३ पासून त्याची अंमलबजावणी देखील सुरू झाली आहे. संपूर्ण भारत भर अशा प्रकारच्या ४५० ते ५०० प्रकल्पांना केंद्र/राज्य सरकार मंजूरी देणार आहे. त्यासाठी केंद्र सरकारने अर्थसंकल्पात १५० कोटींच्या निधीची तरतूद केली आहे. साधारणतः १ कोटी २ लाख जुनी वाहने भंगारात निघाल्यानंतर तितक्याच नव्या वाहनांची गरज निर्माण होणार आहे. त्याने वाहन निर्मिती करणाऱ्या ऑटोमोबाईल इंडस्ट्रीजच्या कामाची गती वाढणार आहे. या इंडस्ट्रीजमधील विविध मोठ्या कंपन्यांना लागणाऱ्या दुचाकी, चारचाकी, माल वाहतूक ट्रक, प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या विविध सुट्या भागांचा पुरवठा कोल्हापुरातील फाउंड्री उद्योगातून केला जातो. त्यामुळे वाहन निर्मितीचा वेग वाढल्याने आपोआपच या फाउंड्री उद्योगातील कामाची गती वाढणार आहे. जिल्ह्यातील फाउंड्रीची एकूण संख्या ४५० असून कास्टिंगचे वार्षिक उत्पादन सुमारे ७ लाख ५० हजार टन इतके आहे.

'कोल्हापुरातून ७० टक्के कास्टिंगचा पुरवठा' होतो. यामध्ये सिलिंडर ब्लॉक, सिलिंडर हेड, पिस्टन, मॅनिफोल्ड, वॉटर पंप, क्रॅकशाफ्ट, ब्रेक ड्रम, ब्रेक डिस्क आदी स्वरूपातील कास्टिंगचा आणि इतर अशा एकूण ७० टक्के कास्टिंगचा समावेश आहे. त्याचा पुरवठा कोल्हापुरातील फाउंड्री उद्योगातून देश-परदेशातील वाहन निर्मिती करणाऱ्या कंपन्या, उद्योगांना केला जातो. त्यामुळे केंद्र, राज्य सरकारने घेतलेल्या जुनी वाहने भंगारात काढण्याच्या निर्णयाचा उद्योग क्षेत्राला निश्चितपणे फायदा होणार असल्याचे महाराष्ट्र चेंबरचे सदस्य प्रकाश मालाडकर यांनी सांगितले.

**पाठबळ मिळाल्यास राज्यभर प्रकल्पाची उभारणी शक्य**

महाराष्ट्र चेंबरचे प्रकाश मालाडकर यांनी यापूर्वी 'अॅल्युमिनियम फाउंड्रीमध्ये लागणाऱ्या मेटलिंग आणि व्होल्डींग फर्नेस' मध्ये वीज



## ०१ एप्रिल, २०२३ पासूनची कोल्हापुरातील स्क्रॅप वाहने

- **एसटी बसेस** ६६
- **अग्निशमन** ८
- **पोलिस वाहने** १४५
- **रुग्णवाहिका** १४ (सरकारी वाहने १२, खासगी २)
- **शिक्षण विभाग** ५
- **नगरविकास वाहने** ३५
- **ग्रामीण विकास विभाग** ४
- **इतर सरकारी कार्यालयाची वाहने** ९४
- **सार्वजनिक बांधकाम** ४
- **इतर विभागाच्या बसेस** २०

**एकूण ३६३**

बचतीचे नवे संशोधन केले आहे. त्याबद्दल त्यांना केंद्रीय विद्युत मंत्रालयाचा 'राष्ट्रीय उर्जा संरक्षण पुरस्कार' मिळाला आहे. आता पुढचे पाऊल म्हणून त्यांनी झेक प्रजासत्ताक कंपनी बरोबर करार करून भारतात प्रकल्पाचे संपूर्ण तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले आहे. या संस्थेच्या सहकार्याने केंद्र सरकारने जाहीर केलेल्या 'स्क्रॅप पॉलिसी धोरणा' वर योजना तयार केली आहे. त्यासाठी त्यांनी इटली, नॉर्वे, जर्मनी, झेक प्रजासत्ताक आणि इंग्लडसह अन्य ठिकाणच्या प्रकल्पाची पाहणी करून, व माहिती घेऊन योजना तयार केली आहे. कोल्हापुरातील गोकुळ शिरगाव एमआयडीसीमध्ये आफेको हिटिंग सिस्टीम युनिटचे ते संचालक आहेत. झेक कंपनी Sinchcombe S.R.O. आणि आफेको हिटिंग सिस्टीम युनिटच्या माध्यमातून त्यांनी प्रकल्पाची योजना तयार केली आहे. या योजनेला मूर्त स्वरुप आणण्यासाठी १०० कोटी रुपये आणि १० एकर जागेची गरज आहे. कोल्हापुरात ही योजना यशस्वी झाल्यास राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात याच पद्धतीने प्रकल्पाची उभारणी होऊ शकते. त्यामुळे फाउंड्री उद्योगाला मिळणारा कच्चा माल/ स्क्रॅप सहजपणे त्या-त्या ठिकाणी उपलब्ध होणार आहे. कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली जिल्हा आणि बेळगाव राज्यात मोठा फाउंड्री उद्योग आहे. या उद्योगांना हजारो टन स्क्रॅप लागतो. प्रकल्प झाल्यास या प्रकारचा उच्च क्वालिटीचा स्क्रॅप परराज्यातून किंवा परदेशातून आयात करावा लागणार नसल्याचे प्रकाश मालाडकर यांनी सांगितले.

**स्क्रॅप वाहनांतून काय मिळणार**

स्क्रॅप /भंगारात निघालेल्या वाहनातून स्टील, कॉपर, ल्युमिनियम, रबर, प्लास्टिक, बॅटरीमधील झिंक, लीड सीड, ऑइल, ब्रेक ऑइल, रेफ्रीजरेंट, गॅस, काच, मॅग्नेशियम, कॅटलॅटिक कनर्व्हटर, त्यासह मौल्यवान धातू जसे की प्लॅटिनम, पॅलेडियम आणि रोडियम मौल्यवान धातू यासह अन्य मटेरियल आणि पार्टचा पुनर्वापर करता येणार आहे. त्यामुळे फाउंड्रीसाठी लागणाऱ्या काही कच्च्या मालाचे दर कमी होतील, असेही त्यांनी सांगितले.

**प्रक्रियेचे टप्पे**

१) वाहन स्क्रॅपिंग टेस्टिंग सेंटर मध्ये जमा करणे.
२) सर्व प्रकारचे सरकारी पातळी वरील रजिस्ट्रेशन नंबर्स रद्द करणे.
३) स्क्रॅपिंग केलेल्या वाहनाचा सरकारी नियमानुसार मोबदला
४) चांगले असलेल्या पार्टचा पुनर्वापर करणे.
५) स्क्रॅपिंग वाहनाचे सर्टिफिकेट देणे.
६) नवीन वाहन खरेदी करताना या सर्टिफिकेटमुळे सर्व प्रकारचे लाभ वाहन धारकाला मिळतील.

> “ स्क्रॅप पॉलिसीचा निश्‍चितपणे कोल्हापूरच्या फाउंड्री उद्योगाला फायदा होणार आहे. फाउंड्रीवर अवलंबून असलेल्या मशिन शॉप, हीट ट्रीटमेंट उद्योगांचेही काम वाढणार आहे. जुनी वाहने भंगारात काढण्याचे नवे उद्योगही सुरू होतील.
>
> – **सचिन शिरगावकर,** अध्यक्ष, आयआयएफ, कोल्हापूर.

**सुमारे ३५ हजार रोजगाराची निर्मिती**

ठिकाठिकाणी या पद्धतीच्या प्रकल्पाची उभारणी झाल्यास त्या ठिकाणी तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे. या प्रकल्प उभारणीसाठी लागणारा निधी आणि जागेची तरतूद झाल्यास सरकारकडून दोन महिन्यात या प्रकल्पाची मंजूरी मिळणार आहे. त्या-त्या जिल्ह्याच्या ठिकाणी आणि तालुक्याच्या ठिकाणी प्रकल्पाची उभारणी झाल्यास तरुणांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

### स्क्रॅप टक्केवारी

कार विविध धातूंच्या मिश्रणाने तयार केल्या जातात. एका कारचे सरासरी वजन १,४००-१,६०० किलो असते. पुनर्वापर केल्यावर ते खालीलप्रमाणे स्क्रॅप होते.

१)६५-७० % स्टील स्क्रॅप तयार करते,
२) ७-८% ॲल्युमिनियम स्क्रॅप,
३) १-१.५ % कॉपर स्क्रॅप आणि
४) १५-२० % रबर स्क्रॅप आणि प्लास्टिक स्क्रॅप.
५) २% मौल्यवान धातू

# परराष्ट्र व्यापार धोरण 2023 गतिशील, मुक्त धोरण असून सर्व गरजांची पूर्तता करेल : पीयुष गोयल



## येत्या २०३० पर्यंत भारताची निर्यात २ ट्रिलियन डॉलर्स पर्यंत करणार



### पुनर्रचना आणि स्वयंचलन प्रक्रिया

नव्या परदेशी व्यापार धोरणामधील विविध मंजुरीसाठी जोखीम व्यवस्थापन प्रणालीसह स्वयंचलित माहिती तंत्रज्ञान प्रणालीद्वारे निर्यातदारांप्रती अधिक विश्वास व्यक्त केला जात आहे. प्रोत्साहनात्मक पद्धतींपासून दूर जात तंत्रज्ञान इंटरफेस आणि सहयोगाच्या तत्त्वांवर आधारित सुविधा देणार्या पद्धतीचा अवलंब करत हे धोरण निर्यात प्रोत्साहन आणि विकासावर भर देते. निर्यात उत्पादनासाठी शुल्क सवलत योजना आता मानवी हस्तक्षेपाची आवश्यकता दूर करत प्रादेशिक कार्यालयांमार्फत नियम–आधारित माहिती तंत्रज्ञान प्रणालीच्या माध्यमातून लागू केल्या जाणार आहेत.

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निर्यात अनेक पटींनी वाढवण्याचा दृष्टीकोन दिला आहे. येत्या २०३० पर्यंत भारताची निर्यात २ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत नेण्याचा परराष्ट्र व्यापार धोरणात प्रयत्न आहे. हे धोरण गतिशील आहे आणि काळाच्या ओघात उद्भवणाऱ्या नवनवीन गरजा पूर्ण करण्यासाठी ते खुले असल्याचे केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग, ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण आणि वस्त्रोद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी 'परराष्ट्र व्यापार धोरण २०२३' मध्ये जाहीर केले.

सेवा आणि व्यापारी मालाच्या निर्यातीसह भारताची एकूण निर्यात ७५० अब्ज डॉलर्सच्या पुढे गेली आहे आणि यावर्षी निर्यात ७६० अब्ज डॉलर्सचा टप्पा ओलांडेल, अशी अपेक्षा या धोरणात व्यक्त केली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा आकार तसेच उत्पादन आणि सेवा क्षेत्राची व्याप्ती पाहता , देशामध्ये अनेक पटीने विकास करण्याची क्षमता आहे. जगभरात या आव्हानात्मक काळात ७६० अब्ज डॉलर्स इतका निर्यातीचा टप्पा ओलांडताना केलेली उल्लेखनीय कामगिरी हा पंतप्रधानांनी रुजवलेला उत्साह आणि प्रोत्साहनाचे फलित आहे. निर्यातीची प्रत्येक संधी साध्य करून तिचा प्रभावी वापर करण्याच्या गरजेवर पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी भर दिला आहे. भारताच्या 'जी–२०' अध्यक्षपदाच्या काळात पुढील ५ महिन्यांत जगभरात क्षेत्र–निहाय आणि देश–निहाय पातळीवर मोठ्या प्रमाणावर पोहचणे आवश्यक असल्याचे केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग पियूष गोयल यांनी जाहीर केले. परराष्ट्र व्यापार धोरण–२०२३ हा एक धोरण दस्तावेज आहे. जो निर्यातीला चालना देणाऱ्या काळाच्या कसोटीवर यशस्वी ठरलेल्या योजनांच्या सलगतेवर आधारित आहे तसेच गतिशील आणि व्यापारविषयक गरजांना प्रतिसाद देणारा आहे. निर्यातदारांवर 'विश्वास' आणि 'भागीदारी' या तत्त्वांवर तो आधारित आहे.

निर्यातदारांसाठी व्यवसाय सुलभता प्रक्रियेची पुनर्रचना आणि स्वयंचलन हा परराष्ट्र व्यापार धोरण २०२३ चा उद्देश आहे. SCOMET अंतर्गत दुहेरी वापराच्या उच्च तंत्रज्ञान असलेल्या वस्तू , ई–कॉमर्स निर्यात सुलभ करणे, निर्यात प्रोत्साहनासाठी राज्ये आणि जिल्ह्यांशी सहकार्य यासारख्या उदयोन्मुख क्षेत्रांवरही हे धोरण लक्ष केंद्रित करते. जुनी प्रलंबित मान्यता बंद करण्यासाठी आणि नव्याने सुरुवात करण्यासाठी निर्यातदारांसाठी नवीन परराष्ट्र व्यापार धोरणात ' वन टाइम एमनेस्टी' योजना आणली आहे.

नवीन परराष्ट्र व्यापार धोरण २०२३ टाउन्स ऑफ एक्स्पोर्ट

एक्सलन्स स्कीम द्वारे नवीन शहरे आणि स्टेटस होल्डर स्कीम द्वारे निर्यातदारांची ओळख करण्याला प्रोत्साहन देते. लोकप्रिय ॲडव्हान्स ऑथोरायझेशन आणि ईपीसीजी योजना सुव्यवस्थित करून आणि भारतातून मालाचा व्यापार सक्षम करून परराष्ट्र व्यापार धोरण २०२३ निर्यात सुलभ करत आहे.

**निर्यात उत्कृष्टतेची शहरे**

सध्याच्या ३९ शहरांव्यतिरिक्त फरिदाबाद, मिर्झापूर, मुरादाबाद आणि वाराणसी या चार नवीन शहरांना निर्यात उत्कृष्टतेचे शहर म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

**निर्यातदारांची ओळख**

निर्यात कामगिरीवर आधारित 'दर्जा' असलेल्या निर्यातदार कंपन्या आता सर्वोत्तम–प्रयत्नाच्या आधारावर क्षमता–बांधणी उपक्रमांमध्ये भागीदार असतील. 'इच वन टीच वन' म्हणजेच 'प्रत्येकाने प्रत्येकाला शिकवा' या उपक्रमाप्रमाणेच, स्वारस्य असलेल्या व्यक्तींना मॉडेल अभ्यासक्रमावर आधारित व्यापार–संबंधित प्रशिक्षण प्रदान करण्यासाठी –तारांकित दर्जा आणि त्यावरील दर्जाधारकांना प्रोत्साहित केले जाईल. यामुळे भारताला २०३० पूर्वी ५ ट्रिलियन डॉलरअर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य करण्यामध्ये सेवा देण्यासाठी सक्षम कुशल मनुष्यबळ भांडार तयार करण्यास मदत होईल.

**जिल्ह्यांमधून निर्यातीला चालना देणे**

जिल्हा स्तरावर निर्यातीला चालना देण्यासाठी आणि तळागाळातील व्यापार व्यवस्थेच्या विकासाला गती देण्यासाठी, राज्य सरकारांसोबत भागीदारी निर्माण करणे आणि जिल्ह्यांना निर्यात केंद्र (डीईएच ) उपक्रम म्हणून पुढे नेणे हे परराष्ट्र व्यापार धोरणाचे उद्दिष्ट आहे.

**एससीओएमईटी धोरणाचे सुलभीकरण**

निर्यात नियंत्रण प्रणाली असलेल्या देशांसोबत भारताचे एकीकरण बळकट होत आहे त्यामुळे .भारत निर्यात नियमन प्रणालीवर अधिक भर देत आहे. भारताने केलेल्या आंतरराष्ट्रीय करार आणि सामंजस्य करारांची अंमलबजावणी करण्यासाठी भागीदारांमध्ये एससीओएमईटी (विशेष रसायने, जीव, साहित्य, उपकरणे आणि तंत्रज्ञान) संदर्भात व्यापक पोहोच आणि समज तसेच धोरणात्मक व्यवस्था अधिक बळकट केली जात आहे. भारतातील एक बळकट निर्यात नियमन प्रणाली भारतातून एससीओएमईटी अंतर्गत नियंत्रित वस्तू/तंत्रज्ञानाची निर्यात सुलभ करताना भारतीय निर्यातदारांना दुहेरी वापराच्या उच्च श्रेणीच्या वस्तू आणि तंत्रज्ञानाची उपलब्धता प्रदान करेल.

**भांडवली वस्तूंच्या निर्यात प्रोत्साहन योजनेअंतर्गत (ईपीसीजी) सुविधा**

निर्यात उत्पादनासाठी शून्य सीमा शुल्कावर भांडवली वस्तूंच्या आयातीला परवानगी देणारी ईपीसीजी योजना अधिक तर्कसंगत बनवली जात आहे.

**अग्रीम अधिकृत परवानगी योजनेअंतर्गत सुविधा**

डीटीए युनिट्सद्वारे उपलब्ध करून देण्यात येणारी अग्रीम अधिकृत परवानगी योजना निर्यात वस्तूंच्या निर्मितीसाठी कच्च्या मालाची शुल्कमुक्त आयात प्रदान करते आणि ती ईओयु आणि सेझ योजनेप्रमाणेच आहे. तथापि, डीटीए युनिटमध्ये देशांतर्गत तसेच निर्यात उत्पादनासाठी काम करण्याची लवचिकता आहे.

**वस्तूंचा व्यापार**

भारताला व्यापारी मालाचे केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी, परराष्ट्र व्यापार धोरण २०२३ ने या व्यापारासाठी तरतुदी सादर केल्या आहेत.निर्यात धोरणांतर्गत मर्यादित आणि प्रतिबंधित वस्तूंचा व्यापार आता शक्य होणार आहे.

**एमनेस्टी योजना**

निर्यातदारांना भेडसावणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी कायदेविषयक दावे कमी करणे आणि विश्वासावर आधारित संबंध वाढवण्यासाठी सरकार पूर्णपणे वचनबद्ध आहे. कर विवाद सौहार्दाने सोडवण्यासाठी एक प्रयत्न असलेल्या विवाद से विश्वास उपक्रमाच्या अनुषंगाने, परदेशी व्यापार धोरण २०२३ अंतर्गत निर्यात दायित्वांमध्ये कसूर झाली असल्यास त्यासंदर्भात निराकरण करण्यासाठी सरकार विशेष वन टाईम एमनेस्टी योजना सादर करत आहे. जे निर्यातदार ईपीसीजी आणि अग्रीम अधिकृत परवानगी योजने अंतर्गत त्यांचे दायित्व पूर्ण करू शकले नाहीत आणि ज्यांना प्रलंबित प्रकरणांशी संबंधित उच्च शुल्क आणि व्याजाचा भार आहे, अशा निर्यातदारांना दिलासा देण्यासाठी ही योजना आहे. या योजनेमुळे या निर्यातदारांना नवीन सुरुवात करण्याची आणि अनुपालनाची संधी मिळणार आहे.

## ई–वाणिज्य निर्यात सुविधा

ई–वाणिज्य निर्यात ही एक आशादायक श्रेणी आहे. यासाठी पारंपारिक ऑफलाइन व्यापारापेक्षा वेगळे धोरणात्मक उपक्रम आवश्यक आहेत. वर्तवलेले विविध अंदाज २०३० पर्यंत २०० ते ३०० अब्ज डॉलर्स श्रेणीतील ई–वाणिज्य निर्यात क्षमता सूचित करतात. परदेशी व्यापार धोरण २०२३ ई–वाणिज्य केंद्र आणि पेमेंट कॉन्सिलिएशन, जमाखर्चाची पद्धत, परत करण्यासंदर्भातले धोरण आणि निर्यात हक्क यांसारखे संबंधित घटक स्थापित करण्यासाठी उद्देश आणि म र्गदर्शक आराखड्याची रूपरेषा प्रदान करते.

**धोरणाचा मुख्य दृष्टीकोन पुढील ४ स्तंभांवर आधारित आहे**

**१. सवलतींना प्रोत्साहन**

**२. सहकार्याच्या माध्यमातून निर्यात प्रोत्साहन – निर्यातदार, राज्ये, जिल्हे, भारतीय दूतावास**

**३. व्यवसाय सुलभता , व्यवहार खर्चात कपात आणि ई–उपक्रम**

**४. उदयोन्मुख क्षेत्रे – ई–कॉमर्स निर्यात केंद्र म्हणून जिल्ह्यांचा विकास आणि SCOMET धोरणाचे सुव्यवस्थापन**



# जागतिक अर्थकारणाला भारत गती देणार

## जागतिक आर्थिक पाहणी अहवालातील निरीक्षण, आर्थिक आघाडीवर घोडदौड

**कोल्हापूर : राजेंद्र जोशी**

भारतीय अर्थव्यवस्था ही जागतिक अर्थव्यवस्थेच्या वृद्धीच्या दृष्टीने दिलासादायक असून आगामी काळात भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थकारणाला गती देण्यास महत्त्वाची भूमिका बजावेल, असे मत आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने नोंदविले आहे.

नाणेनिधीच्या जागतिक आर्थिक पाहणी अहवाल (वर्ल्ड इकोनॉमी आऊटलूक रिपोर्ट) नुकताच प्रसिद्ध झाला आहे. यात २०२३ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था ५.९ टक्क्यांच्या गतीने वाढेल, असे निरीक्षण नोंदविण्यात आले असून भारताच्या या उल्लेखनीय प्रगतीला देशाने अवलंबिलेले डिजिटलायजेशन कारणीभूत ठरले आहे. तसेच कोरोनानंतर गती खुंटलेल्या भारताला तत्कालीन परिस्थितीत केंद्र सरकारची धोरणेही उपयुक्त ठरल्याचे या अहवालात नमूद केले आहे.

नाणेनिधीच्या या अहवालानुसार सध्याच्या जगाच्या अर्थव्यवस्थेची गती २.८ टक्क्यांवर आहे. २०२४ मध्ये ही गती ३ टक्क्यांवर पोहोचेल, असा अंदाज आहे. नाणेनिधीच्या कार्यकारी संचालक क्रिस्टलिना जॉर्जिया यांच्या म्हणण्यानुसार भारत हा गेले काही महिने जागतिक अर्थव्यवस्थेच्या नकाशावर एक तेजस्वी किरण बनून राहिला आहे आणि जगाच्या एकूण अर्थव्यवस्थेच्या वृद्धीत भारताचा १५ टक्के इतका हिस्सा आहे भारताने आपल्या विकासाचा दर मार्च २०२३ अखेर ७८ टक्क्यांवर राखून ठेवता तर चा आर्थिक वर्षात हा विकास दर ६.१ टक्क्यांवर राहील, असा अंदाज आहे.

नाणेनिधीमार्फत जागतिक आर्थिक पाहणी अहवाल तयार करताना एक विशिष्ट प्रारूप वापरले जाते. यामध्ये जगातील ८ मोठ्या अर्थव्यवस्थांचा समावेश आहे. अमेरिका जपान, जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स, चीन, इंडिया आणि बल या देशातील भौगोलिक विकास, उत्पादकतेचा कल निवृत्तीचे वय आणि अन्य परिमाणांचा विचार करून हा हवाल तयार करण्यात येतो. या ८ देशात ५ विकसित अर्थव्यवस्था आणि ३ सर्वात मोठ्या उभरत्या बाजारपेठा व विकसनशील अर्थव्यवस्थांचा समावेश आहे. या देशाचे एकत्रित सकल राष्ट्रीय उत्पन्न जगातील एकूण सकल जागतिक उत्पन्नाच्या ७० टक्क्यांवर आहे. नाणेनिधीच्या या अहवालाने भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासावर शिक्कामोर्तब तर केले आहेच, शिवाय भारत आता जर्मनीला मागे टाकून पुढे जाण्याची तयारी करीत स्पष्ट झाले आहे.

### पाकिस्तान संकटात

१९४७ साली भारत आणि पाकिस्तान हे दोन देश एकाचवेळी जगाच्या नकाशावर आले. गेल्या ७५ वर्षात भारताने जगातील अर्थव्यवस्थांच्या पंक्तीमध्ये ब्रिटनला मागे टाकून पाचवे स्थान पटकाविले आहे. याउलट पाकिस्तानात मात्र अर्थ व्यवस्थेची अवस्था दयनीय आहे. पाकिस्तानात महागाईने ३६.४ टक्क्यांवर विक्रमी झेप घेतली आहे. १९६४ नंतर प्रथमच पाकिस्तान एवढ्या मोठ्या महागाईला तोंड देतो आहे. पाकिस्तानात महागाईचा दर दक्षिण आशियामध्ये सर्वाधिक तर आहेच पण ग्रामीण भागात हा दर ४०.२ टक्क्यांवर पोहोचला आहे. दळणवळणाच्या किंमती ५६.८ टक्क्यांनी तर अन्नधान्यातील महागाई ४८.१ टक्क्यांनी वाढली आहे.





# महाराष्ट्राची उद्योग भरारी...

**ललित गांधी**
अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर



'महाराष्ट्र' हे नेहमीच देशातील उद्योग व अर्थकारणातील प्रगत व अग्रेसर राज्य राहिले आहे.

महाराष्ट्र वस्त्रोद्योग, ऑटोमोबाईल, इंजिनिअरींग, माहिती तंत्रज्ञान, कृषी प्रक्रिया उद्योग, हिरे – आभुषणे, या क्षेत्रात आघाडीवर आहे. देशाच्या एकुण निर्यातीत महाराष्ट्राचा वाटा सुमारे २०% पेक्षा अधिक आहे. देशाच्या एकुण औद्योगिक उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा २०% इतका आहे. देशातील वीजनिर्मिती व वीज वापर दोन्हीमध्ये महाराष्ट्र देशात क्रमांक एकवर आहे. यावरूनच महाराष्ट्राचे देशाच्या उद्योग जगतातील महत्व व राज्याची उद्योगातील आघाडीवर लक्षात येते.

'महाराष्ट्र' ही ओळख घेऊन आपले राज्य ०१ मे १९६० रोजी अस्तित्वात आले असले तरीही राज्याच्या औद्योगिकरणाचा इतिहास शंभर वर्षाहूनही अधिक जुना आहे.

महाराष्ट्राच्या औद्योगिकरणाचा पाया रचणाऱ्याचे महत्वपूर्ण कार्य 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री' ने केले. भारताच्या उद्योग जगतातील टाटा, बिर्ला यांच्या तोडीचे शेठ वालचंद हिराचंद यांनी महारारााष्ट्राच्या म्हणजेच तत्कालीन 'बॉम्बे प्रेसिडेन्सी' इलाख्यात स्थानिक लोकांनी व्यापार–उद्योग उभारावेत, यासाठी १९२७ साली 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज' ची स्थापना केली.

शेठ वालचंद हिराचंद यांनी त्यांचे सहकारी आबासाहेब गरवारे, शंतनुराव व लक्ष्मणराव किर्लोस्कर, बाबासाहेब डहाणुकर या सहकाऱ्यांना सोबत घेऊन 'महाराष्ट्र चेंबर' च्या माध्यमातुन संपूर्ण राज्यभर सातत्याने दौरे करून, स्थानिक लोकांना नवनवीन उद्योगांसाठी प्रोत्साहित केले.

'महाराष्ट्र चेंबर' च्या माध्यमातुन तत्कालीन ब्रिटीश राज्यकर्त्यांना स्थानिक लोकांना उद्योगासाठीचे परवाने देण्यास भाग पाडले.

महाराष्ट्रात म्हणजेच 'महाराष्ट्र' हे राज्य स्वतंत्रपणे अस्तित्वात येण्यापूर्वी 'बॉम्बे प्रेसिडेंन्सी' मध्ये आरंभीच्या काळात कापड गिरण्या मोठ्या प्रमाणात उभ्या राहिल्या. देशातील कापड उद्योगात मुंबई, अहमदाबाद, कलकत्ता ही शहरे आघाडीवर राहिली, मुंबई चे यात विशेष वर्चस्व होते. कालांतराने महाराष्ट्रात इचलकरंजी, मालेगांव व भिवंडी या तीन ठिकाणी वस्त्रोद्योगाचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. हातमागापासून सुरू होऊन यंत्रमाग व आता शटललेस लुम्स अशी प्रगती होत गेली. महाराष्ट्राच्या वेगवेगळया भागात सहकारी व खाजगी सूतगिरण्या मोठ्या प्रमाणावर उभ्या राहिल्या. सध्या महाराष्ट्राच्या सर्वच भागात वस्त्रोद्योग मोठ्या प्रमाणावर विस्तारत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवीन मेगा टेक्सटाईल पार्क उभारण्याची जी घोषणा केली त्यातील एक टेक्सटाईल पार्क 'अमरावती' येथे उभारण्यात येणार आहे.

राज्यात कापूस व रेशीम यांचे विपूल प्रमाणात तर लोकरीचे चांगल्या प्रमाणात उत्पादन होते. त्याबरोबरच अपारंपारीक धाग्याचे चांगले स्त्रोत असलेल्या बांबू, केळी, घायपात, अंबाडी आणि काथ्या यांचे देखील मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. वस्त्रोद्योग धोरण, २०१८-२०२३ वस्त्रोद्योगाच्या पुनरूज्जीवनावर लक्ष केंद्रीत करीत असून या धोरणाचे उद्दिष्ट राज्यातील उत्पादन व प्रक्रिया यांमधील तफावत कमी करणे हे आहे. यामधून ३६,००० कोटी गुंतवणुकीसह १० लाख रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे.

## ऑटोमोबाईल क्षेत्रात आघाडी

वाहन निर्मिती व वाहनांचे सुटे भाग निर्मिती यामध्ये महाराष्ट्राचा वाटा लक्षणीय आहे. देशातील आघाडीच्या वाहन निर्मात्यांना सर्वाधिक सुटे भाग महाराष्ट्रातुन पुरविले जातात. देशातील पहिली कार बनविण्याचा कारखाना 'महाराष्ट्र चेंबर' चे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांनीच मुंबईत उभारला होता. प्रिमिअर पद्मीनी या भारतातील पहिल्या कार चे उत्पादन मुंबईत सुरू झाले व येथुनच ऑटोमोबाईल क्षेत्राचा पाया महाराष्ट्रात रचला गेला. मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक याठिकाणी आघाडीचे वाहन निर्माते आज यशस्वीपणे कार्यरत आहेत. सध्या वेगाने विकसित होत असलेले इलेक्ट्रिक वाहनांच्या उत्पादनात महाराष्ट्र प्रगतीपथावर असून सरकारने प्रोत्साहनासाठी विशेष योजना बनविल्या आहेत.

## निर्यातक्षम रत्न आभुषण व अन्य उद्योग

हिरे व रत्नांच्या तसेच सोने चांदीच्या आभुषणांच्या निर्यातीत महाराष्ट्र अग्रेसर आहे. हिऱ्यांच्या प्रक्रिया उद्योगाचे सुरत मध्ये झालेले स्थलांतर लक्षणीय असले तरीही हिऱ्यांचे दागिने व अन्य आभूषणे यांची निर्यात मात्र महाराष्ट्रातूनच मोठ्या प्रमाणावर होत आहे. महाराष्ट्रातून रत्ने व आभुषणे याबरोबरच पेट्रोकेमिकल्स, इंजिनिअरींग उत्पादने, धातु व धातु उत्पादन, औषधे व औषधी द्रव्ये, कापड व तयार कपडे, शेती आधारीत उत्पादने, प्लास्टीक्स या क्षेत्रात निर्यातीमध्ये महाराष्ट्र अग्रेसर असून, गेल्या तीन वर्षात महाराष्ट्रातून १५ लाख कोटी रूपयांचे उत्पादने निर्यात केली गेली आहेत हे यश नक्कीच लक्षणीय असून या क्षेत्रात प्रगतीसाठी मोठा वाव आहे.

### माहिती तंत्रज्ञान

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातही महाराष्ट्राने वेगवान भरारी घेतली असुन मुंबई व पुणे येथे मोठ्या प्रमाणावर केंद्रीकरण झालेला हा सेवा उद्योग महाराष्ट्राला व पर्यायाने देशाला विदेशी चलन व कर रूपाने मोठा महसूल मिळवून देत आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सिडको व सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया यांनी राज्यात सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान संकुले विकसित केली आहेत. सुमारे १८,००० कोटी गुंतवणूक व सुमारे २.७ लाख रोजगारासह राज्यात एकुण ३७ सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान संकुले कार्यरत आहेत. माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण व्हाव्यात खाजगी क्षेत्रात सहभागी करून घेण्यात आले आहे. माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानाधारित सेवा या धोरणाच्या सुरूवातीपासून माहे ऑक्टोबर २०२२ अखेर एकुण ५७७ खाजगी माहिती तंत्रज्ञान संकूले पूणे (२०३), मुंबई शहर व मुंबई उपनगर (१८६), ठाणे (१७२), नागपूर (५), नाशिक (५), औरंगाबाद (४), वर्धा (१) आणि रायगड (१) या जिल्ह्यांमध्ये मंजूर आहेत.

### नियोजनबध्द औद्योगिक वसाहतींचे जाळे

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री' ने राज्याच्या औद्योगिक विकासासाठी १९२७ पासून सातत्याने केलेले यशस्वी प्रयत्न व त्यातुन सुरू झालेले औद्योगिकरण अधिक सूत्रबध्द व नियमित पध्दतीने व्हावे यासाठी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री' ने सरकारी औद्योगिक वसाहती स्थापन व्हाव्यात यासाठीची संकल्पना राज्य सरकारकडे सातत्याने मांडून त्याचा पाठपुरावा केला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या आंदोलनाचे प्रमुख केंद्र असलेले फोर्ट येथील महाराष्ट्र चेंबरचे मुख्यालय व याठिकाणी

विविध नेत्यांबरोबर दिवंगत यशवंतराव चव्हाण यांचा चेंबरशी निर्माण झालेला जिव्हाळा या पाठपुराव्यासाठी कामी आला व चेंबरच्या मागणीचा यश येऊन महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री दिवंगत यशवंतराव चव्हाण यांनी १९६२ साली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची (MIDC) स्थापना करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला गती व बळ प्रदान करणारा असा हा निर्णय ठरला. आजमितिला महाराष्ट्रात लहान, मोठ्या २९० सरकारी औद्योगिक वसाहती कार्यरत असुन या माध्यमातून ६० हजार उद्योगांनी सुमारे ४ लाख कोटी इतकी गुंतवणूक करून वीस लाखाहून अधिक लोकांना थेट रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

सरकारी औद्योगिक वसाहतींच्या यशानंतर लहान शहरात, ग्रामीण स्तरावर उद्योगांची उभारणी व्हावी यासाठी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री' ने सहकारी औद्योगिक वसाहतींची संकल्पना तत्कालीन मुख्यमंत्री स्व. वसंतदादा पाटील यांचेकडे मांडली, ती त्यांनी स्विकारली व महाराष्ट्रात सहकारी औद्योगिक वसाहतींची उभारणी सुरू झाली. आजमितीस १२५ हून सहकारी औद्योगिक वसाहतींनी हजारो उद्योजकांना उद्योजक बनविण्यात सहकार्य केले आहे.

**मेगा प्रोजेक्टस्**

महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात आरंभापासून राज्यात असलेले विविध क्षेत्रातील मेगा प्रोजेक्टस् यांचा महत्वाचा वाटा राहीला आहे. या प्रकल्पांचे महत्व लक्षत घेऊन सन २००५ पासून राज्यात विशाल प्रकल्प धोरण राबविण्यात येत आहे. राज्यात माहे सप्टेंबर २०२२ पर्यंत ६,१२,२७१ कोटी प्रस्तावित गुंतवणूकीसह ६.७२ लाख अपेक्षित रोजगार निर्मितीच्या ७३८ विशाल प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. त्यापैकी १,३५,९७२ कोटी प्रत्यक्ष गुंतवणुकीसह सुमारे१.७६ लाख रोजगार निर्मिती क्षमतेच्या २५६ प्रकल्पांना पात्रता प्रमाणपत्रे देण्यात आली.

**सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचा वाढता विस्तार**

अतिविशाल, विशाल उद्योगांबरोबरच मध्यम, लघु व सुक्ष्म उद्योगांचा विकास व्हावा, त्यातून नवीन उद्योजक तयार व्हावेत यासाठी केंद्र व राज्य सरकारने सातत्याने प्रयत्न केले, स्वतंत्र एमएसएमई मंत्रालय निर्माण करून केंद्र सरकारने या क्षेत्राला विशेष प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्राने याही क्षेत्रात आघाडी घेतली असून आज महाराष्ट्रात मध्यम, लघु व सूक्ष्म क्षेत्रातील २२ लाखाहून अधिक उद्योग घटक कार्यरत असुन या उद्योगांच्या माध्यमातुन सुमारे दीड कोटी लोकांना रोजगार मिळाला आहे.

**उज्ज्वल भविष्य व अपार संधीचा महासागर म्हणजेच 'महाराष्ट्र'**

महाराष्ट्र व्यापार, उद्योग, सेवा उद्योग या क्षेत्रात नेहमीच आघाडीवर राहीले असुन थेट विदेशी गुंतवणुकीतही राज्याने आपली आघाडी कायम ठेवली आहे. गेल्या तीन वर्षात राज्यात सुमारे १२ लाख कोटी रूपयांची थेट विदेशी गुंतवणुक आली आहे.

दिल्ली–मुंबई औद्योगिक कॉरीडोर, समृध्दि महामार्गालगत विशेष औद्योगिक क्षेत्रे या माध्यमातुन राज्यात वेगवेगळ्या क्षेत्रात नवीन उद्योगांना प्रचंड संधी आहेत. गुंतवणूकीस योग्य वातावरण, कुशल मनुष्यबळ उत्तम सामाजिक वातावरण, साधन संपत्तीची विपुल उपलब्धता यामुळे 'महाराष्ट्र' जगभरातल्या गुंतवणुकदारांचे आकर्षण असलेले राज्य आहे. केंद्र व राज्य सरकारने औद्योगिक विकासासाठी समुह विकास (क्लस्टर आधारीत विकास) धोरण स्विकारून ७० ते ९० टक्यापर्यंत अनुदान देण्याचे धोरण स्विकारने ही उद्योगांना मोठी चालना मिळत आहे.

उद्योग पुरक राज्य व उद्योगस्नेही सरकार बरोबर पंतप्रधान स्वयंरोजगार निर्मिती योजना, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना यासारख्या नवउद्योजकांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देणाऱ्या योजनांचा लाभ तरूण व महिलांना उद्योजकतेसाठी व्हावा यासाठी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' ने युवा उद्योजकता व महिला उद्योजकता अभियानांचा यशस्वी प्रारंभ केला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री उदय सामंत, उद्योग सचिव हर्षदीप कांबळे, उद्योग विकास आयुक्त दिपेंद्र कुशवाह, एमआयडीसीचे सीईओ विपीन शर्मा अशा सकारात्मक मंडळीमुळे राज्याच्या उद्योग क्षेत्राला विकासास पुरक असे वातावरण निर्माण झाले आहे.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री' या राज्याच्या व्यापार, उद्योग, कृषी उद्योग, सेवा क्षेत्राच्या शिखर संस्थेने सर्वांच्या सहकार्याने महाराष्ट्राला देशात क्रमांक एक चे राज्य बनविण्याचा केलेला संकल्प पुर्णत्वास जाईल याची खात्री आहे.



# आष्टा एमआयडीसीसाठी आठ दिवसांत अहवाल सादर करा : खासदार धैर्यशील माने

## नवीन एमआयडीसी साठी 'महाराष्ट्र चेंबर' संपूर्ण सहकार्य करेल : ललित गांधी



**सांगली जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राच्या सोयी सुविधांसाठी आयोजित बैठकीप्रसंगी खास. धैर्यशील माने, सांगलीचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी सोबत उपस्थित प्रशासकीय अधिकारी व उद्योजक**

**सांगली :** आष्टा एमआयडीसीसाठी झालेल्या बैठकीत कारंदवाडी येथील जमीनीचे गट तपासून आठ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश खासदार धैर्यशील माने आणि सांगलीचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिले. यामुळे आष्टा एम आयडीसीच्या कामास गती मिळाली आहे.

सांगलीचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्या दालनात खासदार धैर्यशील माने यांच्या पुढाकाराने आष्टा, कारंदवाडी औद्योगिक क्षेत्रासाठी तसेच सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर शिराळासह सर्व औद्योगिक क्षेत्राच्या सोयी सुविधा तसेच समस्या बाबत महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीसाठी महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांची प्रमुख उपस्थिती होती.

महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, आष्टा परिसरात एमआयडीसीची उभारणी झाल्यास उदयोग व्यवसायाला चालना मिळणार आहे. खासदार धैर्यशील माने यांच्याकडून सुरु असलेल्या प्रयत्न निश्चितच साकार होतील.

पुढे गांधी म्हणाले, नवीन एमआयडीसी क्षेत्र डी प्लस प्लस झोन मध्ये घोषित करून अधिक सवलत द्यावी तसेच या ठिकाणी भूखंडाचे दर नेहमीपेक्षा कमी ठेवावेत म्हणजे उद्योग येण्यास प्रोत्साहन मिळेल अशा मागण्या मांडून मोठे उद्योग जिल्ह्यात येण्यासाठी प्रयत्न महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे प्रयत्न केले जातील अशी ग्वाही दिली

दरम्यान आष्टा येथे एमआयडीसी उभारणीसाठी उद्योग मंत्रालयाकडून तत्वतः मान्यता दिली आहे. ही मान्यता मिळाल्यानंतर लगेचच खासदार धैर्यशील माने यांनी एमआयडीसीच्या उच्च अधिकाऱ्यांच्या समवेत आष्टा येथील कारंदवाडी तसेच वाळू वाट रस्त्यावरील जमिनीची पाहणी केली होती. आष्टा परिसरात कोणत्याही परिस्थितीत एमआयडीसीची उभारणी करायची या उद्देशाने खासदार धैर्यशील माने यांचे प्रयत्न सुरू आहेत. एमआयडीसीच्या उभारणीच्या कार्यास गती मिळण्यासाठी खासदार धैर्यशील माने यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष बैठक घेतली.

या बैठकीत जिल्ह्यातील उद्योजक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. खासदार धैर्यशील माने आणि जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सांगली जिल्ह्यातील उद्योजकांचे प्रश्न सोडवण्याबरोबर त्यांना विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचे आश्वासन या बैठकीत दिले. या बैठकीत सर्वांगीण विषयावर चर्चा झाली. उद्योजकांनी उद्योग उभा करताना येणाऱ्या अडीअडचणीवर प्रकाशझोत टाकला. उद्योजकांना हवे ते सहकार्य करणार असल्याचे आश्वासन खासदार धैर्यशील माने आणि जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिले.

आष्टा शहर आणि परिसरात उद्योग व्यवसाय उभारणे गरजेचे आहे. आष्टा या परिसराची महत्वपूर्ण गरज बनली आहे. येथील तरुणांच्या हाताला काम मिळाले तर या भागाचा अधिक विकास होणार आहे. त्यामुळे आष्टा परिसरात एमआयडीसी तत्काळ सुरु करण्यासाठी प्रयत्नशील आहे. दोन ठिकाणी जागांची पाहणी केली आहे. जागेसाठी चाचपणी सुरू आहे. लवकरच जागा निश्चित होईल आणि एमआयडीसी उभारणीच्या कामाला गती येईल, असे खासदार धैर्यशील माने यांनी सांगितले.

यावेळी गौरव नायकवडी, वीर कुदळे, देवचंद्र आवटी, एम आयडीसीच्या प्रादेशिक अधिकारी वसुंधरा बिरजे, प्रांताधिकारी संपत खिलारी, मंडलाधिकारी लीना पाटील, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक टी. एन. खांडेकर, एमआयडीसीचे सहाय्यक क्षेत्र व्यवस्थापक एस.टी. आरगे, अप्पर तहसीलदार धनश्री भांबुरे, अनामिका दासगुप्ता, कारंदवाडीचे तलाठी अभयकुमार उपाध्ये, उद्योजक अभय खांबे, सतीश मालू, जयराज पाटील, सर्जेराव यादव, दिलीप कोडळकर, उद्योजक रमेश आरवाडे, हरिभाऊ गुरव, शेषापा वाघमोडे, हरीभाऊ सुतार उपस्थित होते.

# शाहूवाडीत एमआयडीसी; मजलेत होणार ड्रायपोर्ट




**कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील उद्योग विभागाशी संबधित विविध प्रश्नाबाबत मुंबईत बैठक झाली. या वेळी बैठकीत चर्चा करताना उद्योगमंत्री उदय सामंत, पालकमंत्री दीपक केसरकर, खासदार धैर्यशील माने, जिल्हाधिकारी राहुल रेखावार आदी मान्यवर.**

**मुंबई :** कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडीसह सांगली जिल्ह्यातील आष्टा येथे नव्या औद्योगिक वसाहतीला उद्योगमंत्री उदय सामंत यांनी तत्वत: मान्यता दिली. मजले (ता. हातकणंगले) येथे ड्रायपोर्ट उभारण्यात येईल, असेही उद्योगमंत्री सामंत यांनी मुंबईत झालेल्या बैठकीत सांगितले. कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व एमआयडीसीमधील पायाभूत सुविधांसाठी १२० कोटी रुपयांचा निधी देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

खासदार धैर्यशील माने यांनी कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील उद्योग विभागाशी संबधित विविध प्रश्नाबाबत बैठक घेण्याची मागणी केली होती. त्यानुसार १८ एप्रिल, २०२३ रोजी उद्योगमंत्री सामंत यांच्या निवासस्थानी बैठक झाली. या वेळी कोल्हापूरचे पालकमंत्री दीपक केसरकर प्रमुख उपस्थित होते.

खासदार धैर्यशील माने म्हणाले, शाहूवाडी हा दुर्गम तालुका म्हणून ओळखला जातो. येथील तरुणांना मुंबई येथे रोजगारासाठी जावे लागते. या तरुणांना आपल्या तालुक्यातच रोजगार उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. गेल्या चार वर्षापासून शाहूवाडी तालुक्यात एमआयडीसीची स्थापना व्हावी, यासाठी प्रयत्न सुरु आहेत. आष्टा (जि. सांगली) येथेही नव्याने औद्योगिक वसाहत स्थापन व्हावी, ही अनेक वर्षापासूनची मागणी आहे. हातकणंगले तालुक्यात ड्रायपोर्ट व्हावा, अशी मागणी आहे. या ड्रायपोर्टमुळे कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील साखर निर्यातीला चालना मिळेल. त्यासह भाजीपाला, शेतीमाल, द्राक्षे तसेच कापड व्यवसायालाही त्याचा मोठा फायदा होणार असल्याने त्याबाबत निर्णय घ्यावा, असेही माने यांनी सांगितले.

या मागणीनंतर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शाहूवाडी आणि आष्टा येथे नव्या एमआयडीसीची स्थापना केली जाईल. त्याला तत्वत: मान्यता देत असल्याचे त्यांनी जाहीर केले. शाहूवाडी येथे एमआयडीसीसाठी ६१ हेक्टरवरील जमीन विनाअधिसूचित करण्याचा प्रस्ताव प्रलंबित आहे. भू–निवड समितीचा अहवाल प्रस्तावित होता. त्यामळे साताळी पठार येथील १२० हेक्टर जमीन संपादित केली जाईल, असेही त्यांनी सांगितले. मजले येथील गायरानातील सुमारे ८५ हेक्टर जागेवर ड्रायपोर्टची उभारणी केली जाईल. ही जमीन एमआयडीसीने राष्ट्रीय महामार्गाला हस्तांतरित करावी, त्याबाबतचा प्रस्ताव सादर करावा, असे आदेशही त्यांनी दिले. कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वच औद्योगिक वसाहतीतील पायाभूत सुविधांसाठी निधी द्यावा, अशी मागणी आहे. अंतर्गत रस्त्यासह विविध प्रलंबित पायाभूत सुविधा देण्यासाठी १२० कोटी रुपयांच्या निधीला मान्यता देत असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले. तसेच या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार तत्काळ प्रस्ताव सादर करण्याचे आदेशही देण्यात आले.

बैठकीला आमदार प्रकाश आवाडे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी बिपीन शर्मा, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी राहुल रेखावार, सहसचिव संजय देगावकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी पाटील, प्रादेशिक अधिकारी राहुल भिंगारे, सांगली प्रादेशिक अधिकारी वसुंधरा बिरजे आदी उपस्थित होते.

### प्रस्तावित एमआयडीसी परिसराची खासदार मानेंकडून पाहणी

मुंबईत झालेल्या बैठकीनंतर शाहूवाडी तालुक्यात एमआयडीसी उभी करण्यासाठी खासदार धैर्यशील माने यांनी संबधित विभागाचे अधिकारी व तहसीलदार यांच्या समवेत शाहूवाडी तालुक्यात तीन ठिकाणी जागेची पाहणी करुन आवश्यक ती माहिती संबधित विभागाकडून घेतली. एमआयडीसीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी पाटील, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी राहुल भिंगारे, अधीक्षक अभियंता गावडे, शाहूवाडीचे तहसीलदार रामलिंग चव्हाण यांच्या समवेत 'वारुळ' डोणोली या ठिकाणच्या जमिनीची पाहणी करुन एमआयडीसीसाठी आवश्यक असलेल्या सोयी सुविधांची अधिक माहिती घेतली. खासदार धैर्यशील माने आणि उद्योग विभागाचे अधिकारी यांनी तहसीलदार राम लिंग चव्हाण यांना तत्काळ अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या.

# करिअरविषयक मार्गदर्शनासाठी राज्यात लवकरच हेल्पलाइन




कुर्ला येथील डॉन बॉस्को इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट येथे आयोजित छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिरामध्ये मार्गदर्शन करताना कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा

## शासकीय आयटीआयमधील विद्यार्थ्यांना मिळणार दरमहा ५०० रुपये विद्यावेतन

## कौशल्य विकास मंत्री मंगल प्रसाद लोढा यांची घोषणा

**मुंबई :** राज्यातील विद्यार्थी, युवक-युवती आणि पालकांना करिअरविषयक विविध संधींची माहिती घरबसल्या घेता यावी यासाठी लवकरच कायमस्वरूपी हेल्पलाईन नंबर आणि ईमेल आयडी सुरू करण्यात येणार आहे. त्यासह येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (आयटीआय) विद्यार्थ्यांना दरमहा पाचशे रुपये विद्यावेतन (स्टायफंड) देण्यात येईल, अशी घोषणा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी मुंबईत केली.

कौशल्य विकास विभागांतर्गत असलेल्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत राज्यातील सर्व जिल्ह्यात छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कुर्ला येथील डॉन बॉस्को इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट येथे आयोजित शिबिराचे उद्घाटन करून या राज्यस्तरीय उपक्रमाचा मंत्री श्री. लोढा यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी कौशल्य विकास विभागाच्या प्रधान सचिव मनिषा वर्मा, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालक दिगंबर दळवी, डॉन बॉस्को संस्थेचे संचालक फादर अँथनी पिंटो, माजी नगरसेवक हरीश भांदिर्गे आदी मान्यवर उपस्थित होते.

मंत्री श्री. मंगलप्रसाद लोढा म्हणाले की, देशात मागील काही वर्षात औद्योगिक, कॉर्पोरेट अशा विविध क्षेत्रात अनेक बदल झाले आहेत. त्या बदलांना अनुसरून विविध कौशल्ये असलेले रोजगार या क्षेत्रामध्ये व्यापक प्रमाणात उपलब्ध झाले आहेत. पण या कौशल्याचे प्रशिक्षण कोठे घ्यायचे, त्यासाठीच्या प्रशिक्षण संस्था कुठे आहेत, प्रवेशप्रक्रिया कशी असते याची माहिती ज्ञान अनेकांना नसते. त्यामुळे अनेक युवक-युवती पारंपरिक शिक्षण, प्रशिक्षणच घेताना दिसतात. या युवकांसाठी भविष्याची विविध नवीन क्षितिजे खुली व्हावीत, नवनवे अभ्यासक्रम, स्किल्स त्यांना माहीत व्हावेत यासाठी कौशल्य विकास विभागाने पुढाकार घेतला आहे. यासाठी राज्यात. ६ मे ते ६ जून २०२३ पर्यंत छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या करिअरविषयक विविध संधींची माहिती या शिबिरांमधून दिली. यामध्ये विद्यार्थी, युवक-युवतींसह पालकांचेही करिअरविषयक समुपदेशन करण्यात आले. राज्यातील ग्रामीण, शहरी अशा सर्व भागातील विद्यार्थी, युवक-युवती व पालकांनी या शिबिरांमध्ये सहभागी झाले होते. बदलत्या काळास अनुसरुन ठिकठिकाणी सुरु झालेल्या विविध शैक्षणिक, व्यावसायिक इत्यादी अभ्यासक्रमांची माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

### स्किलिंग, अपस्किलिंग गरजेचे - प्रधान सचिव मनिषा वर्मा

कौशल्य विकास विभागाच्या प्रधान सचिव मनिषा वर्मा म्हणाल्या की, आपले ज्ञान, कौशल्य सतत अद्ययावत ठेवणे ही आता काळाची गरज बनली आहे. बदलत्या तंत्रज्ञानास अनुसरून सतत अद्ययावत ज्ञान मिळविणे आवश्यक झाले आहे. त्यामुळेच कौशल्य विकास विभाग आता स्किलिंग, अपस्किलिंगवर भर देत आहे. कौशल्य विकास विभागामार्फत आयोजित या करिअर शिबिरांमधून राज्यातील विद्यार्थ्यांना करिअर करण्याची नवनवीन क्षितिजे खुली होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.




विद्यार्थ्यांनी भरवलेले विविध प्रदर्शन.



# अमरावतीत होणार मेगा टेक्सटाइल पार्क

### नांदगाव पेठमध्ये उभारणार १० हजार कोटींचा प्रकल्प

### पंतप्रधान नरेंद्र मोदींची घोषणा

### मेगा टेक्सटाईल पार्कसाठी नांदगाव पेठच्या औद्योगिक वसाहतीत जमिनीचे आरक्षण

**अमरावती :** पीएम मित्रा योजनेअंतर्गत केंद्र सरकारने अमरावतीमध्ये मेगा इंटीग्रेटेड टेक्सटाईल पार्क घोषित करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही घोषणा केली असून देशात सात शहरांत अशाप्रकारचे पार्क होणार असून यामध्ये अमरावतीचा समावेश आहे. पहिल्या टप्प्यात सातही प्रकल्पांसाठी चार हजार कोटीची गुंतवणूक होणार आहे. अमरावतीच्या प्रकल्पात १० हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. नांदगाव पेठ औद्योगीक वसाहतीजवळील पिंपळविहीर येथे सदर प्रकल्प होणार आहे.

दोन वर्षांपूर्वी केंद्र सरकारने देशात सात मेगा टेक्सटाईल पार्क देण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार महाराष्ट्रातील अमरावतीसह देशात सात ठिकाणी 'पीएम मित्रा अंतर्गत (मेगो इंटिग्रेटेड टेक्सटाइल रिजन अँण्ड अँपरेल) मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाइल पार्क स्थापन करण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली. अमरावतीजवळ नांदगाव पेठ येथे हा पार्क उभारला जाणार आहे. या पार्कमुळे पश्चिम विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

या पार्कसाठी राज्य सरकारद्वारे प्रस्ताव मागण्यात आले होते. प्रकल्पासाठी खासदार नवनीत रवी राणा, खासदार डॉ. अनिल बोंडे यांचेसह एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर यांनी देखील पाठपुरावा केला आहे. या प्रकल्पासाठी केंद्र सरकार ७०० कोटी खर्च करणार असून या पार्कचे मार्केटिंग केंद्र सरकार राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर करणार आहे. यातूनच अनेक मोठे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय ब्रँड अमरावतीत येणार आहेत.

या टेक्सटाइल पार्कमुळे १० हजार कोटींची गुंतवणूक शक्य आहे. त्यामुळे सुमारे १ लाख रोजगार निर्माण होतील. महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, तामिळनाडू तेलंगणा, कर्नाटक आणि उत्तर प्रदेशमध्ये 'पीएम मित्रा' अंतर्गत हे पार्क उभारण्यात येणार आहेत. पाच 'एफ' च्या (फार्म टू फायबर टू फॅक्टरी टू फॅशन टू फॉरेन) व्हिजननुसार, या पार्कमुळे देशातील वस्त्रोद्योग क्षेत्राला चालना मिळेल. अमरावती नजीकच्या नांदगाव पेठ येथे पंचतारांकित एम



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमरावतीत मेगा टेक्सटाईल पार्क मंजूर केला. या माध्यमातून एक लाख लोकांना थेट रोजगार, दोन लाख लोकांना अप्रत्यक्ष रोजगार मिळेल. पंतप्रधानांचे फायबर टू कॉटन हे स्वप्न पूर्णत्वास जाणार आहे.

**– डॉ. अनिल बोंडे, खासदार**

अमरावती येथे टेक्सटाईल पार्क निर्मितीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पीयूष गोयल, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पत्रव्यवहार केला होता. मेगा टेक्सटाईल पार्क मंजुरीमुळे एक लाख लोकांना रोजगाराची संधी मिळेल.

**– नवनीत राणा, खासदार, अमरावती**

आयडीसीचा परिसर २८०९.७८ हेक्टर एवढा परिसर आहे. उद्योगासाठी एकूण १०७ भूखंड आरक्षित ठेवण्यात आले आहेत. रेमण्ड, व्हीएचबी हे महत्वाचे प्रकल्प सुरु आहेत. तर रतन इंडिया औष्णिक वीज प्रकल्प कार्यान्वित आहे.

नांदगाव पेठ येथील पंचतारांकीत औद्योगिक वसाहतीमध्ये पिंपळविहीर येथे एक हजार एकर परिसरात प्रकल्पाची पायाभरणी होणार आहे. शेतातून आलेल्या कापसापासून तयार वस्त्र थेट विदेशात निर्यात होणार असल्याने यासाठी रोजगाराचे मोठे दालन उघडणार आहे. जागतिक दर्जाच्या सुविधा अमरावतीमध्ये उपलब्ध होणार असून एकात्मिक प्रक्रिया उद्योग उभारण्यात येणार आहे.

**काय असेल या पार्कमध्ये**

- जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा
- कापड उद्योगासाठी एकात्मिक प्रक्रिया
- आधुनिक औद्योगिक पायाभूत सुविधा
- कमीत कमी एक हजार एकर जमिनीवर पार्कची स्थापना

## महाराष्ट्र चेंबरकडून सातत्याने मागणी पाठपुरावा आणि यश

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲग्रीकल्चर व महाराष्ट्र सरकारचा उद्योग विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २१ डिसेंबर, २०२२ रोजी नागपूर येथील वसंतराव देशपांडे सभागृहात ''विदर्भ विकास परिषद'' संपन्न झाली होती. त्यामध्ये विदर्भातील ११ जिल्ह्यातून हजारांहून अधिक व्यापारी, उद्योजक या परिषदेत सहभागी झाले होते. राज्य सरकारचा उद्योग विभाग, एमएसएमई, एमआयडीसी आणि महाराष्ट्र सरकारचा औद्योगिक संचलनालय यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद झाली होती. या परिषदेत उद्योगमंत्री उदय सामंत यांनी विदर्भाचे अनेक प्रश्न सोडविण्याची ठोस ग्वाही महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांना दिली होती. मुंबईत उद्योजकांची बैठक घेण्याच्या आश्वासनानुसार त्यांची बैठक घेऊन विदर्भातील अनेक औद्योगिक प्रश्न मार्गी लावले.

दरम्यान विदर्भ विकासासाठी जे-जे काही देता येईल, ते सर्व सरकारकडून दिले जाईल, राज्य सरकार उद्योजकांच्या पाठीशी उभे आहे, असेही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आश्वासित केले होते. त्यासह देशात सात मेगा टेक्सटाइल पार्कसह अमरावतीत मेगा टेक्सटाईल पार्कची मागणी लावून धरली होती. परिषदेत सहभागी झालेल्या विदर्भातील अनेक उद्योजकांनी विदर्भांच्या सर्वांगीण विकासासाठी नवे प्रकल्प आणण्याची म ागणी केली होती. त्यासाठी चेंबरने महत्वपूर्ण भूमिका मांडली होती. अखेर अमरावतीत 'मेगा टेक्सटाईल पार्क'चे स्वप्न पूर्ण झाल्याने उद्योजक, व्यापारी बंधूनी महाराष्ट्र चेंबरचे आभार मानले आहे.

## सामूहिक प्रयत्नामुळेच मेगा टेक्सटाइल पार्कची स्वप्नपूर्ती



**– किरण पातुरकर,**
अध्यक्ष, अमरावती एम आयडीसी असोसिएशन, फेडरेशन असोसिएशन ऑफ विदर्भ

कापूस उत्पादक जिल्ह्यात कापसावर आधारित उद्योग उभे राहण्यासाठी टेक्सटाईल पार्कची स्थापना करण्यासाठी सन १९९४ मध्ये पहिले पत्र तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्याकडे दिले होते. त्यानंतर सातत्याने पाठपुरावा सुरु राहिला. सन २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर पश्चिम विदर्भाचे 'मेगा पार्क'चे स्वप्न पूर्ण होऊन अमरावतीला 'मेगा टेक्स्टाईल पार्क' स्थापन झाला. उद्योजक आणि व्यापारी बंधूच्या विविध मागण्यांसह विदर्भाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲग्रीकल्चरने विदर्भ विकास परिषद घेतली होती. त्यात प्रामुख्याने 'मेगा टेक्सटाईल पार्क' ची मागणी विदर्भ विकास परिषदेत मांडली. त्यासह सातत्याने अनेक संघटनांनी पाठपुरावा केला. विदर्भातून अमरावती एमआयडीसी आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने संयुक्तपणे सातत्याने अविरत पाठपुरावा केला. अमरावतीत 'मेगा टेक्साइल पार्क' होण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची महत्त्वाची भूमिका आहे. त्यांच्या प्रयत्नानेच 'मेगा टेक्स्टाईल पार्क' अमरावतीत झाला.

## गुंतवणूकीचा टक्का वाढणार





**'पीएम मित्रा' अंतर्गत नियोजित 'मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल पार्क'च्या अनुषंगाने अमरावती येथे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी बैठक घेऊन पुढील सूचना दिल्या दुसऱ्या छायाचित्रात नियोजित 'मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल पार्क'च्या आराखड्याची पाहणी त्यांनी केली.**

# गुंतवणूक व रोजगारवृद्धीसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उभारा : उद्योगमंत्री उदय सामंत

**अमरावती :** अमरावती येथील अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रात 'पीएम मित्रा पार्क' हा महाराष्ट्राचा 'ड्रीम प्रोजेक्ट' आहे. त्यासाठी भूसंपादन दोन महिन्यात पूर्ण झाले असून, येथे गुंतवणूकीसाठी अनेक मोठ्या उद्योगांनी तयारी दर्शवली आहे. परदेशी गुंतवणूक व मोठी रोजगारनिर्मिती या प्रकल्पातून साध्य होणार आहे. त्यादृष्टीने येथे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उभाराव्यात, असे निर्देश उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिले.

'पीएम मित्रा' अंतर्गत नियोजित 'मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल पार्क'च्या अनुषंगाने बैठक उद्योग मंत्री श्री. सामंत यांच्या अध्यक्षतेखाली औद्योगिक वसाहतीतील 'सीईपीटी' सभागृहात झाली. खासदार डॉ. अनिल बोंडे, खासदार नवनीत राणा, आमदार रवी राणा, एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर, 'सीईपीटी'चे डॉ. किशोर मालवीय, उद्योग विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी उपेंद्र तामोरे, मुख्य अभियंता राजेश झंजाळ, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अपर जिल्हाधिकारी रामदास सिद्धभट्टी, 'एमआयडीसी'चे प्रादेशिक अधिकारी प्रशांत पाडळकर, कार्यकारी अभियंता राहुल बनसोड आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल पार्कमुळे परिसरात प्रत्यक्ष १ लक्ष व अप्रत्यक्ष २ लक्ष अशी ३ लक्ष रोजगारनिर्मिती होईल.येथील वस्त्रोद्योग उद्योगाला आवश्यक असलेला कापूस याच परिसरात उत्पादित होण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न करण्यात येतील. त्याविषयीच्या संशोधनाला वाव मिळण्यासाठी कापूस संशोधन उपकेंद्राची निर्मिती करण्यात येईल. येथील पीएम मित्रा वस्त्रोद्योग पार्कच्या अनुषंगाने ३० मोठ्या वस्त्रोद्योग उद्योजकांसमवेत मुंबईत बैठक झाली. त्यात रेमंडसारख्या मोठ्या उद्योगांनी गुंतवणुकीची तयारी दर्शवली आहे. भूसंपादन गतीने पूर्ण झाले असून, शेतकरी बांधवांना येत्या दोन आठवड्यात मोबदला अदा करण्यात येईल.

**'प्लग ॲन्ड पे'अंतर्गत छोट्या उद्योगांनाही चालना**

'प्लग ॲन्ड पे'अंतर्गत छोट्या उद्योगांसाठी १०० युनिट साकारण्याचे नियोजन आहे. त्यात ५०० चौ. मी. बांधकाम विकसित करून ५०० चौ. मी. मोकळ्या जागेसह एकूण १ हजार चौ. मी. भूखंड देण्यात येईल. छोटे उद्योजक तिथे थेट आपला प्रकल्प सुरू करू शकतील. त्याचप्रमाणे, बचत गटांच्या उत्पादननिर्मितीला चालना मिळण्यासाठी ग्रामोद्योग वसाहतही उभारण्यात येईल. त्यासाठी पायाभूत सुविधा विकसित करुन छोट्या उद्योगांना व बचत गटांना येथे उद्योग सुरू करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले.

**सांडपाणी प्रक्रियेसाठीचे दर १०० रू. हून कमी करणार**

एमआयडीसी इंडस्ट्रियल असोसिएशनच्या सदस्यांशी चर्चा करून उद्योग मंत्र्यांनी त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. सांडपाणी प्रक्रियेसाठी उद्योगांकडून परक्युबिक मीटर २५५ रू. दर आकारला जातो. ही बाब गुंतवणुकीला अडचणीची ठरू शकते. हे लक्षात घेऊन हा दर एका महिन्यातच १०० रूपयांहून कमी करण्यात येईल, अशी ग्वाही उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी दिली. वीजदरात सवलत व इतर आवश्यक बाबींसाठी वस्त्रोद्योग धोरण निर्माण करण्याचा निर्णय यावेळी झाला.

**उद्योगांना आवश्यक सुविधा उभाराव्यात**

उद्योगांना आवश्यक रस्ते, वीज, पाणी, शाळा, टाऊनशिप आदी सर्व सुविधा गतीने उभाराव्यात. उद्योजकांच्या मागणीनुसार आवश्यक सर्व सोयी निर्माण करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. कोविड काळामुळे ज्या उद्योजकांकडून भूखंड मिळूनही उद्योग उभारणी झाली नाही किंवा जिथे आवश्यक सुविधा उपलब्ध नव्हत्या, अशा भूखंडधारकांना एक वर्ष मुदतवाढ देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. बैठकीला एमआयडीसी इंडस्ट्रियल असोसिएशनचे दिलीप अग्रवाल, आशिष सावजी, पुरूषोत्तम बजाज, विजय मोहता आदी उपस्थित होते.

# सत्यनारायण लाहोटींचे कार्य अनेकांना मार्गदर्शक ठरेल : माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर



## लाहोटी यांचा ७५ अमृत महोत्सव विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात

**बीड :** व्यापाऱ्यांच्या हितासाठी सत्यनारायण लाहोटी यांनी कणखर भूमिका घेऊन सरकार दरबारी प्रश्न मांडून ते मार्गी लावले. मनशक्ती कणखर असेल व संघर्षाची तयारी असेल तर आयुष्याचा प्रवास सुखकर होतो. सत्यनारायण लाहोटी यांनी व्यापाऱ्यांसाठी केलेले कार्य हे पुढील पिढीसाठी मार्गदर्शक ठरेल, असे गौरवोद्गार माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी काढले. बीड येथील सामाजिक धार्मिक शैक्षणिक व व्यवसाय उद्योगातील अद्वितीय व्यक्तिमत्व सत्यनारायण लाहोटी यांच्या ७५ अमृत महोत्सवानिमित्त गौरव समितीच्या वतीने सत्कार सोहळा झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानावरुन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर बोलत होते.

या वेळी श्रीक्षेत्र चाकरवाडी संस्थानचे ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड, महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आणि सहकारमंत्री अतुल सावे, बीडच्या खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे, उद्योजक राम भोगले यांच्या विशेष उपस्थितीसह राज्यभरातील मराठवाडा चेंबर्स ऑफ कॉमर्सचे पदाधिकारी उपस्थित होते. बीड येथील एमआयडीसी रोडवरील वृंदावन लॉन्स गार्डन येथे हा अमृतमहोत्सवी सोहळा झाला.

या वेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, सामान्य कुटुंबातून असामान्य व्यक्ती महत्त्व निर्माण झालेले सत्यनारायण लाहोटी यांच्या जीवन प्रवास पाहता त्यांनी केलेला संघर्ष लक्षात घेण्यासारखा आहे. विविध क्षेत्रात कार्यरत असताना त्यांनी आयुष्यभर समाजाची सेवा करत व्यापाऱ्यांचे अनेक प्रश्न सोडवले आहेत.

केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड म्हणाले, बीड जिल्ह्यात स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अधिक शाखांची आवश्यकता असून शाखा कमी असल्यामुळे अनेकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे त्यांच्या या मागणीचा निश्चित विचार करून शाखा वाढवण्यासाठी आपण प्रयत्न केले जातील.

या वेळी अमृत महोत्सव सोहळा समितीचे स्वागताध्यक्ष आणि महाराष्ट्र चेंबर्सचे माजी अध्यक्ष मानसिंह बाळासाहेब पवार यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले उद्योग क्षेत्रासह सामाजिक, धामिक आणि आर्थिक क्षेत्राम ध्ये आपल्या कार्याचा ठसा सत्यनारायणजी लाहोटी यांनी उमटविला आहे. त्यांनी समाजासाठी मोठे योगदान दिले असून त्याचा आदर्श तरुण पिढीने घ्यावा. सन्मानपत्राचे वाचन राजेंद्र मुनोत यांनी केले. या वेळी राज्यातून जिल्ह्यातून व्यापारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्याध्यक्ष सुरेशचंद्र पापालालजी लड्डा यांनी आभार मानले.

महाराष्ट्र चेंबर्सचे माजी अध्यक्ष विक्रम सारडा, माजी अध्यक्ष हेमंत राठी, माजी अध्यक्ष रामजी भोगले, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेशजी दाशरथी, सारस्वत को– ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष गौतम ठाकूर, बीड जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष प्रदीप चितलांगे, अखिल भारतीय माहेश्र्वरी सभेचे मा. मंत्री कस्तुरचंद बाहेती, उपसभापती अशोक बंग, संयुक्त मंत्री सुरेंद्र मानधने, महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेचे अध्यक्ष श्रीकिशन भन्साळी, चेन्नई आदित्य विक्रम बिर्लाचे नवल राठी आदींच्या उपस्थितीत हा प्रमुख सोहळा झाला. बीडच्या खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांचे भाषण झाले.





महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या कृषी अन्न प्रक्रिया समितीने मे. सांगळे ॲग्रो एक्सपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड, पिंपळस नाशिक या उद्योग समूहाला महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्यांनी भेट दिली. या उद्योगातून ४० देशात द्राक्ष, अंजीर, किसमिस आदींसह विविध कृषी फळ व भाजीपाला उत्पादने निर्यात होत असल्याबद्दल कौतुक केले. उद्योगाचे संचालक राजाराम सांगळे यांनी उद्योगाची माहिती दिली. यावेळी उपस्थित चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, कार्यकारणी सदस्य रणजीतसिंग आनंद, महाराष्ट्र चेंबरचे उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमन कांतीलाल चोपडा, को– चेअरमन संजय सोनवणे, रवी जैन यांच्यासह महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

 

**अमेरिकेतील इन्ग्रेडीऑन कंपनीने भारतात फूड फार्मा क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या मालेगाव येथील एम. बी. ग्रुप ला भेट दिली. दुसऱ्या छायाचित्रात इन्ग्रेडियॉनच्या पदाधिकारी यांनी एम.बी. शुगरचे अध्यक्ष व कार्यकारी संचालक विजयकुमार लोढा यांच्याशी चर्चा केली यावेळी उपस्थितात तंत्र संचालक दिनेशकुमार लोढा, विपणन संचालक अनिलकुमार लोढा सम्यक लोढा, ऋषभ लोढा, सौरभ लोढा आदी मान्यवर**

# मालेगावच्या मॅनिटॅब फार्मामध्ये अमेरिकन कंपनीची अब्जावधींची गुंतवणूक

## परकीय गुंतवणूकीने मालेगाव आघाडीवर

**मालेगांव :** फूड व फार्मा क्षेत्रात विश्वात अग्रेसर असलेल्या अमेरिकेतील इन्ग्रेडीऑन कंपनीने (Ingredion Company) भारतात फूड फार्मा क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या मालेगाव येथील एम. बी. ग्रुपशी (M.B.Group) संलग्न मॅनिटॅब फार्मा (Manitab Pharma) स्पेशलिटी कंपनीत अब्जावधी रुपयाची गुंतवणूक केली आहे. या गुंतवणुकीने उद्योग क्षेत्रात ग्लोबल स्तरावर 'मॅनीटॅब फार्मा' कंपनीचा समावेश झाल्याने तसेच परराष्ट्रीय गुंतवणूक आल्याने मालेगाव शहराच्या नावलौकिकात भर पडली आहे. येथील एम. बी. शुगर्सने सन २०१७ मध्ये स्प्रेड्राईड मॅनीटॉलचे भारतातील सर्वात पहिले उत्पादन सुरू करत मुहूर्तमेढ रोवली होती.

भारतातील फार्मा क्षेत्रातील अग्रणी कंपन्यांना आपले उत्पादन पुरवत आपला मोर्चा परदेशी बाजारपेठांकडे वळविला होता. कोरिया, इजिप्त, तैवान, नेपाळ, श्रीलंका, आदी देशांमध्ये व्यापारास सुरुवात केली आहे. बांगलादेश, थायलंड मध्ये व्यापार सुरू होण्याच्या मार्गावर आहे. एम. बी. शुगर नव्या बाजारपेठा काबीज करतानाच देशाच्या विदेशी मुद्रा भांडार वाढविण्यास देखील हातभार लावत आहे.

अल्पावधीतच मॅनिटॅबमध्ये एम.बी. शुगरची प्रगती लक्षात घेत अमेरिकेतील इन्ग्रेडिऑन या फुड फार्मा क्षेत्रातील कंपनीने मॅनिटॉल उत्पादनामध्ये रुची असल्याचे संकेत दिले होते. या पार्श्वभूमीवर एम. बी. शुगर व इन्ग्रेडियऑन कंपनीची संयुक्त घटक कंपनी करुन मॅनिटॅब स्पेशालिटीजची निर्मिती केली गेली. या मॅनिटॅब कंपनीने मॅनीटॉल व इतर घटकांचे उत्पादन घेतले जात आहे. हा पदार्थ टॅबलेट मध्ये मुख्यता वापरला जातो या संयुक्त कंपनी निर्मितीस एम.बी. शुगर्स चे संचालक ऋषभ, सौरभ व नेहा लोढा यांचा मोठा वाटा राहिला आहे.

अमेरिकेतील इन्ग्रेडिऑन कंपनीने मॅनी टॅब फाम मिध्ये अब्जावधीची गुंतवणूक केली असल्याने रोजगार निर्मितीस मोठ्या प्रमाणात चालना देखील मिळणार आहे. मॅनी टॅब फार्मा मध्ये गुंतवणूक केल्यानंतर इन्ग्रेडिऑनचे अध्यक्ष व कार्यकारी संचालक जिम झॅली यांच्यासह कंपनीच्या एशिया पॅसिफिक प्रमुख वॉल्डरींन इव्हान्स, जागतिक संपर्क अधिकारी राणा कयाल, भारतातील प्रमुख अधिकारी प्रकाश कृष्णन, लेखाधिकारी मयंक गांधी यांनी म ालेगावी मॅनिटॅब फार्मा कंपनीस भेट देत पाहणी केली.

इन्ग्रेडियॉनच्या पदाधिकारी व अधिकाऱ्यांचे एम.बी. शुगरचे अध्यक्ष व कार्यकारी संचालक विजयकुमार लोढा, तंत्र संचालक दिनेशकुमार लोढा, विपणन संचालक अनिलकुमार लोढा सम्यक लोढा, ऋषभ लोढा, सौरभ लोढा यांनी त्यांचे स्वागत केले. मॅनीटॅब उद्योगाची पाहणी केल्यानंतर इन्ग्रेडियॉनचे अध्यक्ष जिम झॅली यांनी कंपनीच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले

### महाराष्ट्र चेंबरच्या अनुभवाचा मोठा फायदा झाला : अनिल लोढा



महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्समध्ये विविध कामाचा अनुभव मिळाला या अनुभवाच्या जोरावरच यशोशिखर गाठता आले. चेंबरचा अनुभव व्यवसाय वृध्दीसाठी मोलाचा ठरला. भविष्यात उद्योगातमोठ्यागुंतवणुकीचीसंधीआहे, अशी माहिती एमबी शुगरचे संचालक महाराष्ट्र चेंबरचे माजी उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा यांनी दिली.

# व्यापाऱ्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सरकारकडे पाठपुरावा करणार : माजी मंत्री पंकजा मुंडे





**बीड जिल्हा भव्य व्यापारी परिषदेच्या उद्घाटन माजी मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी उपस्थितात मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड ॲन्ड कॉमर्सचे अध्यक्ष आदेशपालसिंग छाबडा, चेंबरचे उपाध्यक्ष श्री तनसुख झांबड, महाराष्ट्र चेंबरचे माजी उपाध्यक्ष सत्यनारायण लाहेटी, आमदार गजानन घुगे, धनराज बंब आदी मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात मार्गदर्शन करताना आमदार धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे**

**बीड :** व्यापाऱ्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडे पाठपुरावा करुन सोडविले जातील, असे आश्वासन माजी मंत्री आणि भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांनी दिले. मराठवाडा चेंबर आणि विविध व्यापारी सघंटना परळी वैजनाथ यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्हा भव्य व्यापारी परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड ॲन्ड कॉमर्सचे अध्यक्ष आदेशपालसिंग छाबडा होते. परळी येथील हळगे गार्डनमध्ये ही परिषद पार पडली.

माजी मंत्री पंकजा मुंडे, म्हणाल्या, अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा व्यापारी वर्ग आहे. तो व्यवस्थित असल्यास अर्थव्यवस्था सुरळीत चालते. व्यापारी वर्गाच्या सर्व अडचणी सोडविण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला जाईल. आमदार धनंजय मुंडे यांनी आपण व्यापाऱ्यांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर लढाई करण्याची तयारी दर्शविली. त्यासह व्यापारी भवन उभारण्याचे आश्वासन दिले.

चेंबरचे उपाध्यक्ष श्री तनसुख झांबड यांनी महाराष्ट्र चेंबर मार्फत उद्योग व व्यापाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा करून प्रश्नांची सोडवणूकीची माहिती सांगितली. बीड जिल्ह्यात कृषी क्षेत्रामध्ये कृषी वर आधारित क्लस्टर व गूळ क्लस्टर स्थापनेसह केंद्र सरकारने कापूस उद्योगाची निर्मिती करावी, असे आवाहन केले. नगर–परळी रेल्वे मार्ग कमी वेळेत पूर्ण करावा, अशी मागणी केली. विविध व्यापारी संघटनानी व्यापारी बंधूसाठी पेन्शन योजना आणि जीएसटीच्या किचकट कायदा सुलभ करण्याची मागणी केली.

यावेळी महाराष्ट्र चेंबरचे माजी उपाध्यक्ष सत्यनारायण लाहेटी, आमदार गजानन घुगे, धनराज बंब, शशिकरण गडम, सूर्यकांत हाके, वाय जनार्धनराव, भास्करराव जाधव , मनमोहन कलंत्री, सचिव लक्षीनारायण राठी, जिल्हा व्यापारी महासंघाचे संजयकुमार कांकरिया, शिवशंकर स्वामी, जयंत देवळानकर, गोपाल पटेल उपस्थित होते. चकोर गांधी, अर्थतज्ज्ञ उमेश शर्मा, ज्ञानेश्वर माऊली फड, संदीप लाहोटी, रिखबचंद कांकरिया यांच्यासह व्यापारी वर्गाने कार्यक्रमाचे संयोजन केले. परिषदेसाठी सुमारे १ हजारांहून अधिक जण उपस्थित होते.

# नाविन्यपूर्ण कल्पनांवर आधारित छोटी कंपनी म्हणजे स्टार्टअप : डॉ. युवराज परदेशी

**ऑनलाइन सेमिनार :** स्टार्टअप म्हणजे मुख्यता नाविन्यपूर्ण कल्पनांवर आधारित एक छोटी कंपनी आहे, असे प्रतिपादन अर्थतज्ज्ञ डॉ. युवराज परदेशी यांनी केले. महाराष्ट्र चेंबरच्या महिला समितीच्या वतीने आयोजित 'स्टार्टअप बिझनेस सेमिनार' मध्ये 'स्टार्टअप व बिजनेस' या विषयावर त्यांनी उपस्थितासोबत संवाद साधला.

अर्थतज्ज्ञ डॉ. युवराज परदेशी उपस्थितांसोबत संवाद साधताना म्हणाले, 'स्टार्टअप' म्हणजे मुख्यता नाविन्यपूर्ण कल्पनांवर आधारित एक छोटी कंपनी, नाविन्यपूर्ण कल्पना जिच्या जोरावर बाजारपेठ कशी काबीज करता येईल आणि आपली कंपनी कशी मोठी करता येईल याचा विचार असतो. येथे पहिल्या दिवसापासून नफा कमविण्याचा विचार करावा लागत नाही. उत्पादन म्हणजे व्यवसाय नाही तर विक्री म्हणजे व्यवसाय, व्यवसायात यशस्वी होण्यासाठी मार्केट शोधणे आणि मार्केट मिळवणे, हे मुख्य काम आहे. दरम्यान त्यांनी 'बिझनेस व स्टार्टअप' यातील फरक चित्रफितीद्वारे उदाहरणांसह स्पष्ट केला.

सुरुवातीला महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या २५ विविध समित्या असून महिला समिती ही एक महत्त्वाची समिती आहे. महिला समितीतर्फे आयोजित 'बिझनेस स्टार्टअप' सेमिनारचे नावीन्यपूर्ण विषय घेऊन आयोजित केले. या सेमिनार मधून निश्चितच सर्वांना 'स्टार्टअप व बिझनेस' यातील फरक कळेल. स्टार्टअपला प्रसिद्धी खूप मिळाली परंतु स्टार्टअप म्हणजे काय हे अजूनही लोकांना माहिती नाही. त्याची माहिती या सेमिनारच्या माध्यमातून निश्चितच मिळाली, असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगून उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. विश्वस्त मंडळाचे चेअरमन श्री. आशिष पेडणेकर यांनी ही 'बिझनेस स्टार्टअप' सेमिनारला शुभेच्छा देऊन या सेमिनारच्या माध्यमातून महिलांना उत्कृष्ट मार्गदर्शन मिळाल्याचे सांगितले.

महिला समितीच्या चेअरपर्सन सौ. संगीता पाटील यांनी प्रास्ताविक केले. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली महिला समितीतर्फे गेल्या वर्षभरापासून महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी व्यापार उद्योगात येण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. महिला उद्योजकता अभियान सुरू करण्यात आले असून महिला समिती दर महिन्याला विविध उपक्रम आयोजित करणार असल्याचे सांगितले. स्टार्टअप करू इच्छिणाऱ्या महिलांना योग्य मार्गदर्शन देण्याचे काम महिला समितीतर्फे करण्यात येणार असल्याची महिला समितीच्या संगीता पाटील यांनी सांगितले. 'स्टार्टअप' कसे सुरु करावे यासाठी कंपनीची ओळख निर्माण करणे कंपनी प्रोप्रायडरशिप एलएलपी प्रायव्हेट लिमिटेड आहे, याची नियम नुसार नोंदणी करणे स्टार्टअप इंडियाच्या वेबसाईटवर कंपनीची नवीन स्टार्टअप म्हणून




नोंदणी करावी, डीपीआयआयटी येथून मान्यता मिळवावी. मार्केट रिसर्च व इंक्युबॅशन सेंटर याचेही महत्त्व व माहिती, को–फाउंडरची निवड कशी करावी, याची माहिती अर्थतज्ञ डॉ. युवराज परदेशी यांनी सांगितली. दरम्यान सेमिनार मध्ये सहभागी झालेल्या महिला उद्योजकांनी स्टार्टअप बद्दल विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे डॉ. परदेशी यांनी दिली. सेमिनारमध्ये महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष चंद्रशेखर पुनाळेकर, श्वेता इनामदार, सविता पटेल, दीपा राऊत, तेजस्वी राठोड, रेखा पागधरे, प्रभारी सहकार्यवाह सागर नागरे, सचिव विनी दत्ता यांच्यासह महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. अर्थतज्ञ डॉ. युवराज परदेशी यांचा परिचय संगीता पाटील यांनी करून दिला. महिला समितीच्या को–चेअरपर्सन कविता देशमुख यांनी आभार मानले.

**स्टार्टअपसाठी संधी मिळणे महत्त्वाचे**

डॉ. युवराज परदेशी म्हणाले, देशात मान्यताप्राप्त ९२ हजार स्टार्टअप आहेत व १०६ युनिकॉर्न आहेत. युनिकॉन म्हणजे एक बिलियन डॉलरच्या वर व्हॅल्युएशन असलेले उद्योग. स्टार्टअपसाठी संधी मिळणे महत्त्वाचे आहे, नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्व्हिसेस (नॅसकॉम) तर्फे केलेल्या सर्वे १८% स्टार्टअपचे नेतृत्व महिला करत आहेत. स्टार्टअपच्या प्रवासाची सविस्तर माहिती त्यांनी दिली. कल्पना, रिसर्च, डिझाईन प्रोडक्ट हे यातील महत्त्वाचे टप्पे असून ऑनलाइन शॉपिंगचे अनेक स्टार्टअप यशस्वी झाले आहेत. स्टार्टअपचे उदाहरण देताना वडापाव, उसाचा रस, पाणीपुरी याची चित्रफितीद्वारे सविस्तर माहिती दिली. स्विगी, कॅबबोट व झोमॅटोचे उदाहरण दिले.





## महाराष्ट्र चेंबरतर्फे मटका वॉटर मार्च उपक्रमाद्वारे जागतिक जल दिन साजरा

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स आणि जुहू एरोबिक अँण्ड योगा असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक जलदिनानिमित्त 'मटका वॉटर मार्च' या अभिनव उपक्रमाद्वारे 'जागतिक जल दिन' साजरा करण्यात आला. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला.' पाण्याचे महत्व व संवर्धन' विषयावर प्रबोधनासाठी कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात जुहू समुद्रकिनारी मटका घेऊन सुमारे ३०० हून अधिक नागरिक सहभागी झाले. कार्यक्रमास महाराष्ट्र चेंबरचे विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, डॉ. धनश्री हरदास, जुहू एरोबिक्सचे उषा पटेल, नम्रता ठक्कर, रोशन यांची प्रमुख उपस्थिती होती. आशिष पेडणेकर, चेअरमन डॉ. धनश्री हरदास यांनी जागतिक जल दिनानिमित्त पाण्याचे महत्व सांगितले. उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी रोहित शर्मा व त्यांच्या टीमने 'जल है तो कल है' याविषयी एक नाटक सादर केले. जागतिक जल दिनानिमित्त उपस्थित सर्वांनी पाणी संवर्धनाची शपथ घेतली.



## राज्याचे उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचा महाराष्ट्र चेंबरतर्फे सत्कार

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲग्रीकल्चरतर्फे राज्याचे उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे नाशिकमध्ये स्वागत करण्यात आले. महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष सुधाकर देशमुख यांनी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना 'गिरणा गौरव पुरस्कार'मिळाल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याप्रसंगी कार्यकारिणी सदस्य संजय राठी, कैलास आहेर, कैलास पाटील उपस्थित होते.राज्याचे उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र कार्यालयास भेट देण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

## नाशिकच्या औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याशी भेट

महाराष्ट्र चेंबर, निमा, आयमा, लघुउद्योग भारती यासह औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेतली. नाशिकच्या औद्योगिक क्षेत्रासाठी जागा मिळावी, नाशिक औद्योगिक क्षेत्रात नवीन मोठे उद्योग आणावेत, अशी मागणी शिष्टमंडळाने केली. तसेच औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, यासह विविध विषयावर चर्चा केली. शिष्टमंडळात महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, उपाध्यक्ष आशिष नहार, कार्यकारिणी सदस्य राजेंद्र कोठावदे, संजय महाजन, कैलास पाटील, सुमित नहार आदींसह संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.



## महाराष्ट्र चेंबरतर्फे क्रेडाईचे अध्यक्ष कृणाल पाटील, सेक्रेटरी गौरव ठक्कर यांचा सत्कार

**नाशिक :** क्रेडाईचे नवनिर्वाचित अध्यक्ष कृणाल पाटील व सेक्रेटरी गौरव ठक्कर यांचा सत्कार महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष सुधाकर देशमुख व उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमन कांतीलाल चोपडा यांच्या हस्ते झाला. पद्मश्री बाबुभाई राठी सभागृहात सत्कार सोहळा झाला. या वेळी क्रेडाईचे नवनिर्वाचित अध्यक्ष कृणाल पाटील यांनी पर्यावरणाचा समतोल राखून नाशिकच्या सर्वांगिण विकासासाठी संयुक्तपणे काम करण्याचे आश्वासन दिले. सेक्रेटरी गौरव ठक्कर यांनी महाराष्ट्र चेंबरच्या सर्व उपक्रमात क्रेडाईचा सहभाग असेल आणि शहर व राज्याचा विकास करतांना एकत्रितपणे काम करु, असे सांगितले. या वेळी कार्यकारीणी सदस्य संजय राठी, कैलास पाटील, हेमंत कांकरिया, राजू राठी, मंदार वाईकर, संजय महाजन, प्रमोद दीक्षित, सचिव विनी दत्ता आदी उपस्थित होते. उत्तर महाराष्ट्र शाखा को चेअरमन संजय सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. सचिन शहा यांनी आभार मानले.

# उद्योजकांनी सकारात्मक काम करावे : दिनेश शर्मा



**‘नवीन उद्योग व अस्तित्वात असलेल्या उद्योगांसाठी मानसिकता’ विकसित करण्याबाबत या विषयावर ड्यूपॉन्ट कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक दिनेश शर्मा यांनी मार्गदर्शन केले. उपस्थितात नवउद्योजकांसह मान्यवर.**

नाशिक : उद्योजकांनी सकारात्मक विचार करुन ध्येयपूर्ती होईपर्यत पाठपुरावा करणे आवश्यक आहे. तरच निश्चित यशप्राप्ती साध्य होऊ शकते, असे प्रतिपादन ड्यूपॉन्ट कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक दिनेश शर्मा यांनी केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरच्या वतीने राज्यातील नव उद्योगांसाठी आवश्यक वैधानिक अनुपालन, नवीन उद्योगासाठी उपलब्ध अनुदाने आणि तुमच्या उद्योगासाठी मानसिकता कशी विकसित करावी या विषयावर ६ मे रोजी सायंकाळी नाशिक एमजी रोडवरील पद्मश्री बाबुभाई राठी सभागृह, सारडा संकुल येथे सेमिनार संपन्न झाले. त्या वेळी ते बोलत होते.

वक्ते दिनेश शर्मा यांनी ‘नवीन उद्योग व अस्तित्वात असलेल्या उद्योगांसाठी मानसिकता’ विकसित करण्याबाबत या विषयावर मार्गदर्शन केले. केंद्र व राज्य सरकारचे उद्योगासाठी उपलब्ध अनुदानांची सविस्तर माहिती त्यांनी दिली. व्यवसायाच्या विविध समस्या सोडवण्याच्या पद्धतीवर सविस्तर मार्गदर्शन केले. उद्योगाच्या सबसिडी तपशीलासह मोठ्या व्यवसायाच्या वाढीसाठी विविध साधने आणि विविध तंत्र सांगितले. यशस्वी व्यवसायासह आनंदी जीवनाचा कानमंत्रही त्यांनी दिला.

व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष सुधाकर देशमुख उत्तर महाराष्ट्र शाखा को–चेअरमन संजय सोनवणे, सचिव विनी दत्ता उपस्थित होते. सुधाकर देशमुख यांनी उपस्थितांचे स्वागत केले. संजय सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. कार्य. सदस्य व्हिनस वाणी यांनी सेमिनारचे महत्व सांगितले.





# PLOT FOR SALE

Plot for Sale at Ambad MIDC, Nashik-422010

Area – 7962 Sq Mtr.

Contact:

MR. HEMANT PABALKAR

Mobile: 9819448899

Email: hemantpabalkar@gmail.com

## इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरींग क्लस्टरच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार मिळेल : उद्योगमंत्री उदय सामंत

**पुणे :** रांजणगाव येथील औद्योगिक वसाहतीत इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरींग क्लस्टर (इएमसी) प्रकल्पाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात लघु उद्योग सुरू होऊन तरुणांना रोजगार मिळेल, असे प्रतिपादन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज केले. रांजणगाव औद्योगिक वसाहत येथील रिया हाऊस येथे इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरींग क्लस्टर (इएमसी) व चाकण व तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधासंदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ पुणे क्षेत्राचे मुख्य अभियंता नितीन वानखेडे, अधीक्षक अभियंता आर.एस. गावडे, कार्यकारी अभियंता दिलीप जोगवे, मारुती कालकुटकी, संजय कोतवाड, प्रादेशिक अधिकारी सचिन बारवकर आदी उपस्थित होते. उद्योगमंत्री सामंत म्हणाले, रांजणगाव औद्योगिक वसाहतीत केंद्र सरकारने इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरींग क्लस्टर प्रकल्प मंजूर केला आहे. हा महाराष्ट्रातील पहिलाच प्रकल्प असून या प्रकल्पाच्या पायाभूत सुविधांसाठी राज्य सरकारने ३४७ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. त्याचबरोबर ६५० कोटी रुपयांचा निधी पाईप लाईनसाठी मंजूर केला आहे. प्लग आणि प्लेचे ६० युनिट सुरू करण्यात येत आहेत. त्याला चांगला प्रतिसाद मिळाल्यास ५० एकर जागेत हे क्षेत्र वाढवण्याचा मानस आहे.

## पर्यावरण संवर्धनात प्रत्येकाने सहभाग घ्यावा : पर्यावरण प्रधान सचिव प्रवीण दराडे

**मुंबई :** सिंगल युज प्लास्टिकला सशक्त पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे सिंगल युज प्लास्टिकचा वापर पूर्णपणे बंद करून पर्यावरण संवर्धनात प्रत्येकाने मोलाची भूमिका बजावली पाहिजे, असे प्रतिपादन पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी केले.

जागतिक वसुंधरा दिनानिमित्त (२२ एप्रिल) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'सिंगल युज' प्लास्टिकला पर्यायी वस्तूंचे प्रदर्शन मंत्रालयाच्या त्रिमूर्ती प्रांगणात झाले. या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रधान सचिव प्रवीण दराडे यांच्या हस्ते झाले.

'सिंगल युज' प्लास्टिकच्या वापराला पूर्णपणे बंदी जाहीर झाल्यानंतर त्याला पर्यायी वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणात तयार होऊ लागले आहे. परंतू सिंगल युज प्लास्टिकला सक्षम पर्यायी वस्तू उपलब्ध होऊ शकतात. याबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये व्यापक जागृती करण्याच्या उद्देशाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. सिंगल युज प्लास्टिक म्हणजे एकदा वापरून फेकून देण्यात येणाऱ्या वस्तू. उदा. प्लास्टिकचे चमचे, प्लास्टिक प्लेटस, प्लास्टिकच्या वाट्या, हॉटेल मधून अन्नपदार्थ ग्राहकांना पोचवण्यासाठी वापरण्यात येणारे प्लास्टिकचे डबे, स्ट्रॉ, प्लास्टिक पिशव्या होत. त्याचबरोबर वाळ्याचे गणपती, मातीचा पुनर्वापर करून तयार केलेली गणेशमूर्ती, ग्रीन गीफ्टींग वृक्ष वाटिका, पुठ्ठयांपासून बनवलेली लहान मुलांची खेळणी अशा विविध रेखीव वस्तूंचा प्रदर्शनात समावेश होता.

## अर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील कंपनी महाराष्ट्रात ८० हजार कोटींची गुंतवणूक करणार

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत कंपनीच्या शिष्टमंडळाने केली चर्चा

**मुंबई :** स्टील निर्मिती आणि प्रक्रिया, पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी अर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडिया लि. ही स्टील निर्मितीमधील प्रमुख आंतरराष्ट्रीय कंपनी महाराष्ट्रात ८० हजार कोटी रूपयांची गुंतवणूक करण्यास इच्छुक आहे. त्यासंदर्भात कंपनीच्या शिष्टमंडळाने मुंबईत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी प्राथमिक चर्चा केली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सीमा परिसरात सुमारे एक हजार एकर जमीन प्राथमिक टप्प्यात देण्यास तत्वत: मान्यता दिली. याबाबत जागा निश्चिती, उर्वरित जमीन आणि भूसंपादन प्रक्रियेसाठी मेरिटाईम बोर्ड, एमआयडीसी आणि कंपनी प्रतिनिधींनी स्वतंत्र बैठक घेऊन निर्णय घ्यावा. कंपनीच्या गुंतवणुकीमुळे राज्यातील हजारो तरूणांना रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे यांनी प्रास्ताविक केले. रंजन धर यांनी कंपनीची गुंतवणुकीविषयीची माहिती दिली. बैठकीला वाहतूक आणि बंदरे विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे (एमआयडीसी) मुख्य कार्यकारी अधिकारी विपीन शर्मा, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अमित सैनी, विकास आयुक्त (उद्योग) दीपेंद्र सिंह कुशवाह, अर्सेलर मित्तल निप्पॉन स्टिल इंडिया लि. चे विक्री संचालक आलेन लेगरीस आदी उपस्थित होते.

# PROCESS AND SYSTEM – BACKBONE OF YOUR ORGANISATION

**- Mr. Hrishikesh Oak**

### Introduction:

